मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

र्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

ानेवारी-
फेब्रुवारी
१९६३

या अंकात

* प्रा. गो. मा. कुलकर्णी
* प्रा. भा. श्री. परांजपे
* प्रा. ग. मो. पाटील
* प्रा. दा. ल. अडोणी
* प्रा. श्री. ना. बनहट्टी व प्रा. सुरेश म. डोळके

★

शिवाय, संपादकीय,

परिचय–परामर्श, पत्रव्यवहार, संघवार्ता इ०

ूल्य ५० न. पैसे

संपादक:- प्रा. श्री. मा. कुलकर्णी

विदर्भ साहित्य संघ

सर्व सभासदांना विनंती

विदर्भ साहित्य संघाचे नवीन वर्ष १ एप्रिल १९६३ पासून सुरू झाले आहे. तरी सर्व जुन्या साधारण सभासदांनी आपली वर्गणी रु. ३ त्वरित पाठवावी ही विनंती आहे.

एप्रिल महिन्यात ज्या सभासदांची वर्गणी जमा होणार नाही त्यांचेकडे मे १९६३ चा युगवाणीचा अंक व्ही. पी. ने पाठविण्यात येईल. तरी त्यावेळी व्ही. पी. सोडवून घ्यावी ही विनंती आहे.

सरचिटणीस
वि. सा. संघ

हे मासिक एम्. जो. सराफ यांनी नागपुर टाइम्स प्रेस, रामदासपेठ नागपूर-१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले

अनुक्रमणिका

:: संपादक मंडळ ::

भा. श्री. परांजपे
व. कृ. वऱ्हाडपांडे
मा. गो. वैद्य

युगवाणी

संपादक:—श्री. मा. कुलकर्णी

वर्ष १७] जानेवारी–फेब्रुवारी १९६३ [अंक ९–१०

संपादकीय

डॉ. शं. दा. पेंडसे यांना अभिवादन

१९ जानेवारी रोजी डॉ. शं. दा. पेंडसे यांचा म. म. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. हा सत्कार त्याच कार्यासाठी स्थापन झालेल्या सत्कारसमितीने आयोजित केला होता. ही समिति डॉ. पेंडसे यांच्या विद्यार्थ्यांनी व सहकाऱ्यांनी स्थापिली होती. तथापि तिच्या कार्याला महाराष्ट्रभर विखुरलेल्या डॉ. पेंडसे यांच्या असंख्य चाहत्यांचा व हितचिंतकांचा पाठिंबा होता. आणि म्हणून झाला तो सत्कार प्रातिनिधिक स्वरूपाचा व व्यापक असाच होता. आणि ते योग्यच होय. तीन तपेपर्यंत अखंडपणे अध्ययन–अध्यापनाचे व्रत चालवून डॉ. पेंडसे यांनी मराठी भाषा व साहित्य यांचीच केवळ नव्हे तर मराठी संस्कृति व मराठी समाजाचीहि जी बहुमोल सेवा केली तिच्याविषयी कृतज्ञता दाखविणे हे त्यांच्या विद्यार्थ्यांचेच नव्हे तर पर्यायाने समाजाचेहि कर्तव्यच होते. शिवाय विद्यालयीन अध्यापना व्यतिरिक्त डॉ. पेंडसे यांनी आपल्या प्रभावी वाणीने व लेखणीने मराठीच्या विशाल नगरीतील नागरिकांनाहि संतवाङ्मयातील शिकवणीचा जो सुकाळ करून दिला व मराठ्यांच्या इतिहासाचे जे स्फूर्तिप्रद दर्शन घडविले त्याच्या ऋणातून उत्तीर्ण होण्याचा अल्पसा प्रयत्न नागरिकांनी करणे हे त्यांचे कर्तव्य ठरत नाही काय ? डॉ. पेंडसे यांच्या विषयीची कृतज्ञता व्यक्त करण्याची ही पर्वणी उपलब्ध करून दिल्याबद्दल सत्कारसमिति धन्यवादास पात्र आहे.

डॉ. पेंडसे यांचा गौरव म्हणजे एका परीने अध्ययन-अध्यापनाच्या कार्याचा गौरव आहे. आणि या दृष्टीने या गौरवाला अेक विशेष महत्व आहे असे आम्हाला वाटते. ज्या या भारतवर्षात गुरू व गुरूकुल यांची पूर्वी इतकी प्रतिष्ठा होती की राजसत्ता देखील तिथे नतमस्तक होत असे त्याच भारतवर्षात आज गुरूला मास्तराची अवकळा व गुरूकुलाला कारखान्याची रया प्राप्त झालेली आहे. अशा या काळात अेका निष्ठावंत अध्यापकाचा गौरव व्हावा ही गोष्ट शुभसूचक मानली पाहिजे. ती जशी डॉ. पेंडसे यांना गौरवास्पद आहे, तशीच त्यांच्या विद्यार्थ्यांना व हितचिंतकांनाहि भूषणावह आहे.

डॉ. पेंडसे यांनी मराठी भाषेची व साहित्याची दुहेरी सेवा केली आहे. 'ज्ञानेश्वरांचे तत्वज्ञान', 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास', 'ज्ञानेश्वरीचा अभ्यास' 'मराठी संत : काव्य आणि कर्मयोग' या मौलिक ग्रंथाची मराठी वाङमयात त्यांनी भर घातली आहे. तसेंच मराठी संत, त्यांचे तत्वज्ञान, त्यांची शिकवण, त्यांचे कार्य इ० संबंधी गेल्या ३०-४० वर्षांत जे वाद उत्पन्न झाले त्यात हिरिरीने भाग घेऊन त्यांनी या वादातील पाखंडी मतांचे खंडन केले आहे. या त्यांच्या दुहेरी सेवेबद्दल आम्ही त्यांचे अभिवादनपूर्वक अभिनदन करतो आणि त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतितो.

मराठी साहित्य महामंडळ

मराठी साहित्य महामंडळाची बैठक दि. १९ व २० जानेवारी रोजी वि. सा. संघात झाली. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन महामंडळाच्या वतीने भरविण्याचा व महामंडळाने मान्य व पुरस्कृत केलेल्या शुद्धलेखनाच्या नियमावलीचा प्रचार व प्रसार करण्याचा असे जे दोन निर्णय महामंडळाने या बैठकीत घेतले ते स्वागतार्ह आहेत.

पुढील वर्षी श्री. ह ना. आपटे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त महाराष्ट्र शासनाने त्यांचे साहित्य प्रकाशित करून ते स्वस्त किंमतीस उपलब्ध करून द्यावे अशी शासनाला सूचना करण्याचा निर्णयहि महामंडळाने घेतला तो रास्तच म्हणावा लागेल. मुद्रणकलेच्या शोधाने व प्रगतीने साहित्याचा प्रसार खूप वाढला. परंतु त्याबरोबरच ग्रंथांचा टिकावूपणा कमी झाला. म्हणून रक्षणीय साहित्य-ग्रंथांच्या वारंवार आवृत्या काढणे आवश्यक आहे. प्रकाशन व्यवसायाच्या एकंदर स्थिति-गतीचा व साहित्य-संस्थांच्या परिस्थितीचा विचार करता हे कार्य शासनांकडेच जाते. ते त्याने आस्थेने करावे अशी नम्र विनंति आम्ही करतो.

पत्रव्यवहार

['युगवाणी'च्या सप्टेंबर व ऑक्टोबर,-नोव्हेंबर १९६२ या दोन अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रा. पंडितांच्या 'रे० टिळक' या लेखाला अनुलक्षून रे. टिळकांचे नातू श्री. अशोक टिळक यांनी हे पत्र धाडले आहे. प्रा. पंडितांचा लेख सप्रमाणच आहे. तथापि प्रस्तुत पत्रातील कांही मजकूर त्याला पूरक होईल असे वाटल्यावरून ते येथे समग्र प्रसिद्ध करीत आहोत.---संपादक.]

शांतिसदन, विकासवाडी
पो. कोसवाड–हिल,

श्री संपादक महाशय,
युगवाणी, यांसी,
सविनय नमस्कार वि. वि.

युगवाणीच्या दोन अंकांतील, भवानीशंकर पंडित यांचे रे. टिळकांवरील दोन लेखांक वाचून हे लिहीत आहें. रे. टिळकांवर आतांपर्यंत पुष्कळ लिखाण झालेलें आहे, पण या दोन लेखांकांइतकें समतोल व मूलग्राही फार थोडें.

इतकें असूनहि त्यांतील थोडासा भाग मला खटकला. त्यावर माझ्या माहितीप्रमाणें खुलासा करण्याचा हा यत्न आहे. प्रा. भवानीशंकरजींना विरोध करण्याचा माझा प्रयत्न नसून त्यांच्या लेखनास प्रपूरक अशी थोडी माहिती मात्र मला द्यावयाची आहे. माझ्या दृष्टीसमोर मुख्यत: त्यांच्या लेखाचा उत्तरार्ध आहे.

(१) " टिळकांची मनोवृत्ति विनोदाला अनुकूल नव्हती. ते व्याजोक्ति लिहीत. परंतु नंतर त्यांना पस्तावा होई असें त्यांच्या पत्नींनीं नमूद केलें आहे." (युगवाणी ऑक्टो. ६२. पृ. १९)

टिळकांना एकदोन कविता लिहिल्याबद्दल नंतर वाईट वाटलें ही गोष्ट खरी, पण तो पस्तावा व्याजोक्ति लिहिल्याबद्दल नव्हता. तर कांहीं विशिष्ट व्यक्तीला या कवितेद्वारें दुखविल्याबद्दल होता. एका गृहस्थांनीं टिळकांची निंदानालस्ती करण्याचा जणूं विडाच उचललेला होता. त्यांना उद्देशून त्यांनीं या कवितेंत "जाळ वार्तेला कीं जाळ अशा तोंडाला" हे उद्गार काढले होते. त्यांबद्दलचाच हा पस्तावा. पण "माझी चिलीम" "वैरागी," जॉनी, खोटा रुपया, "आम्हीं

टाकीलें टाकीलें–" या कित्येक कविता उपरोधपूर्ण असूनहि टिळकांना त्यांच्या रचनेबद्दल थोडाहि पश्चात्ताप कधी झालेला नाही.

(२) "टिळकांचा इंग्रजी कवितेचा अभ्यास होता. पण तो तत्कालीन अमेरिकन कवींच्या कवितांचा होता असा माझा तर्क आहे." (पृ. २०)

टिळकांच्या पिढींतल्या इतर सर्व इंग्रजी-शिक्षित कवींप्रमाणे टिळकांचा Golden Treasury चा अभ्यास झालेला होता. पुढें ख्रिस्ती उपासनेच्या निमित्तानें इंग्रजी उपासना-संगीताचें त्यांनीं चांगलें वाचन केलेले दिसतें (या उपासना-संगीतांत नव्या, जुन्या, छोटया मोठया, अनेक कवींच्या भक्तिपर कवितेचा समावेश आहे). अमेरिकन श्रेष्ठ कवि, लॉंगफेलो हा टिळकांना फार प्रिय झालेला दिसतो. त्याच्या "साम ऑफ लाइफ," 'एक्सेलिसियर' अशा अनेक कवितांची टिळकांनीं भाषांतरें केलीं आहेत. सरोजिनी नायडू यांचें द–गोल्डन थ्रेशोल्ड हें पुस्तक त्याना फार आवडलें होतें. सुरुवाती–सुरुवातीला इंग्रजी व्यासंग वाढविण्याच्या ईर्षेनें त्यांनीं शेक्स्पीयर व मिल्टन यांचाहि अभ्यास केला होताच. पण प्रत्यक्ष त्यांच्यावर परिणाम लॉंगफेलोचा मात्र थोडाफार झालेला दिसतो.

३. "पुरुष संसाराच्या रथांत बसून पराक्रम करणारा महारथी आहे, तर तो रथ चालविणारी स्त्री कुशल सारथी आहे अशी त्यांची स्त्रीपुरुष-सहवासासंबंधी कल्पना होती" (पृ. २१)

टिळकांनीं घेतलेलें रुपक जरा वेगळें आहे. ते स्त्रीला महारथी म्हणतात व पुरुषाकडे सारथ्याची भूमिका देतात. सारथी, युद्धांत निवळ कोचमन नसतो, तर रथीचा रक्षणकर्ता, सहाय्यक,. व सल्लागार असतो, असें महाभारतावरुन दिसते. निदान टिळकांच्या या रुपकांत, "स्त्री" हा खरा प्रमुख कार्यकर्ता व पुरुष त्याचा रक्षणकर्ता+सहायक+सल्लागार=सारथी आहे. श्री. देवदत्तरावांनीं "नारायण वामनटिळक=व्यक्तिदर्शन व काव्यविवेचन" या पुस्तकांत यावर केलेलें स्पष्टीकरण पहावें.

४. "टिळक ख्रिस्तमतानुयायी खरे. परंतु विवाहसंबंधांत अनुरूपता कुलीनता, शील इत्यादि बाबी लक्षांत घेतल्या पाहिजेत या मताचे होते" (पृ. २४)

यांतील 'कुलीनता' हा शब्द खटकतो. कारण कुल, जाती. इ गोष्टीपेक्षां व्यक्तीच्या शीलावरच त्याची खरी किंमत अवलंबून असते हें टिळकांचें आवडतें तत्व होतें. त्यांची "शीलं परं भूषणम्" ही छोटी नाटिका हेंच प्रस्थापित करण्यासाठीं लिहिलेली आहे. प्रा. पंडित म्हणतात त्या "इकडची पत्रे तिकडची पत्रें"

(पृष्ठ ४७ वर)

तरुणांनो, पश्चिमेकडे जा !

ले०—प्रा. गो. मा. कुलकर्णी
सेंटलुई, अमेरिका

'नव्या जगात' आल्या पासून पश्चिमेकडे केव्हा तरी जायचं असं मी मनाशी ठरवलं होतं. पॅसिफिक किनाऱ्याचं दर्शन घेतल्या शिवाय अमेरिकेची 'यात्रा' सफल होत नाही असं म्हटलं तरी चालेल. कॅलिफोर्निया राज्याच्या सौंदर्याची वर्णनं पुष्कळ वाचली होती. आणि इथे आल्या पासून अनेकांनी 'कॅलिफोर्नियाला गेल्या शिवाय परत जाऊ नका' 'परत जाण्यापूर्वी कॅलिफोर्नियाला अवश्य जाऊन या' अशा प्रकारची शिफारस केली होती. शेवटी असं वाटायला लागलं की आपल्याला परत भारताला जायचं असेल तर कॅलिफोर्नियाला जाऊन येणं आवश्यक आहे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी अमेरिकेत सर्वत्र ऐकू येणारं घोषवाक्य 'तरुणांनो, पश्चिमेकडे जा !' सारखं कानात घुमायला लागलं.

अमेरिकेचे पूर्व–पश्चिम स्वाभाविक भाग तीन आहेत: पूर्व, मध्यपूर्व, आणि पश्चिम. उत्तर–दक्षिण भाग दोन : उत्तर आणि दक्षिण. मुख्यतः हे भौगोलिक विभाग असले तरी त्यांच्या मुळाशी राजकारण आहे. अमेरिकेच्या संयुक्त राज्याचा विस्तार पूर्वेकडून पश्चिमेकडे झाला आहे. प्रारंभी अॅटलांटिक किनाऱ्यावर लहानशी तेरा राज्ये होती. मग पश्चिमेकडे मिसिसिपी नदी पर्यंत त्यांचा विस्तार झाला. फ्रेंचा पासून १८०३ मध्ये तत्कालीन अध्यक्ष जेफर्सन याने बराच मोठा प्रदेश विकत घेतला व त्याची अनेक राज्यात विभागणी केली. मी राहतो ते सेंटलूई शहर ज्या मिसूरी राज्यात आहे ते एका काळी अमेरिकेच्या संयुक्त राज्याची पश्चिम सीमा होती. त्या नंतर आणखी पश्चिमेकडे विस्तार झाला. मेक्सिको पासून कॅलिफोर्नियाचा प्रदेश १८४८ मध्ये मिळविल्या नंतर पश्चिम किनाऱ्याकडे जाण्याची अहमहमिकाच सुरू झाली. त्यातून कॅलिफोर्नियातील सोन्याच्या खाणींचा शोध लागताच तिकडे जाणारांची रीघच लागली. याला 'गोल्ड रश्' म्हणतात. याच काळात 'तरुणांनो, पश्चिमेकडे जा !' हे घोषवाक्य प्रचलित झालं. नशीब काढायचं असेल तर पश्चिमेकडे जावं असं आजहि म्हटलं जातं. आणि अनेक कुटुंबं, विशेषतः तरुण मुलं दाट वस्तीच्या पूर्व भागातून विरळ वस्तीच्या पश्चिम भागाकडे नशीब काढण्यासाठी जात असतात.

अनुक्रमणिका

मला पश्चिमेकडे जायचं होतं ते नशीब काढण्यासाठी नव्हे. नशीब काढण्याला सोपं असं तिकडे काय आहे हे पाहण्यासाठी मला जायचं होतं. ज्याची अनेकांनी स्तुति केली ते सृष्टिसौंदर्य पाहण्यासाठी जायचं होतं. म्हणून आपण पश्चिमेकडे केव्हांतरी जायचंच असा मी निश्चय केला होता. अर्थात् हा निश्चय पार पाडणं कांही सोपं काम नव्हतं. अमेरिकेत प्रवासाच्या सोयी फार उत्तम आहेत. तासी ७० मैल वेगानं धावणाऱ्या ग्रेहाउंड बसेस अमेरिकेच्या कुठल्याहि भागात नेऊन सोडायला सदैव तत्पर असतात. पण त्यांना कांहीतरी द्यावं लागतं. आणि ते काही थोडं थोडकं नाही. शिवाय जिथे जाऊ तिथे राहणा–जेवणाचा आणि वाहनांचा खर्चहि कांही कमी नसतो. ज्याच्या जवळ स्वत:ची मोटार आहे त्याला प्रवास करणं स्वस्त पडतं. पण आम्हाला ग्रेहाउंडनंच जाणं भाग होतं. अंतरहि फार. सेंट लुईहून सॅन फ्रान्सिस्को दोन हजार मैल आहे. या वरुन प्रवासाच्या खर्चाची कल्पना येईल. तरी पश्चिमेकडे जायचं व आपण तरुण आहोत हे सिद्ध करायचं असं मी ठरवलं.

पहिला टप्पा म्हणून साल्ट लेक सिटीला जायचं मी ठरवलं. साल्ट लेक सिटी सेंट लुई पासून पश्चिमेला साडेबाराशे मैलावर यूटाह राज्याची राजधानी आहे. तिथे माझे मित्र डॉ. हेमंत कुलकर्णी गेल्या चार वर्षापासून राहतात. ते हैद्राबादच्या अुस्मानिया विद्यापीठात इंग्रजीचे प्राध्यापक आहेत. चांगल्या पैकी कानडी कवि व कादंबरीकार आहेत. चार वर्षापूर्वी यूटाह युनिव्हर्सिटीमधे पीएच्.डी. साठी आले व अभ्यास पूर्ण करून तिथेच गेल्या वर्षापासून व्हिजिटिंग लेक्चरर म्हणून काम करीत आहेत. त्यांचा व माझा फार जुना स्नेह. नाम-सादृश्यामुळे आम्ही एकमेकाला बंधुराज म्हणत असू. ते अमेरिकेला आल्यापासून आमची भेट झाली नव्हती. व पत्रव्यवहारहि फारसा नव्हता. मी सेंट लुईला आल्यापासून मात्र आमचा पत्रव्यवहार बराच नियमित सुरु झाला. आम्हांला एकमेकांना भेटायचं होतं. त्यांचं मला तिकडे येण्याचं निमंत्रण होतं. आणि मला पश्चिमेकडे जायचं होतं. सर्व गोष्टी जुळून आल्या, आणि मी पश्चिम–स्वारीची तयारी केली. माझा 'सह-त्रासी' श्रीपाद आगाशे त्यालाहि त्या स्वारीसाठी तयार केलं. प्रवासात आणखी कुणी बरोबर असलं म्हणजे वेळ मजेत जातो. अमेरिकेत 'आणखी कुणी' म्हणजे वेगळंच माणूस असतं. पण आम्ही आमचे आम्हीच होतो.

जूनच्या अकरा तारखेला संध्याकाळी साडे सहा वाजता आम्ही ग्रे हाउंडनं सेंट लुई सोडलं व तेरा तारखेला सकाळी साडे सात वाजता साल्ट लेक सिटीस पोंचलो. सुमारे अडतीस तास आम्ही त्या बसमध्ये बसले होतो. दोन रात्री आणि एक दिवस बसमधे घालवला. आता प्रवासात थकवा व कंटाळा येणारच. पण येवढा प्रवास करून साल्ट लेकला उतरल्या नंतर 'म्हणण्यासारखे थकलो नाही'

असंच वाटलं. याला कारण सडका व बस. अमेरिकेतल्या हाइवेजची तारीफ करावी तेवढी थोडीच. रुंद व गुळगुळीत सडकांचं सबंध अमेरिकाभर जाळं पसरलं आहे. प्रत्येक हाइवेला नंबर आहे. एकदा नकाशात सडकांचे नंबर पाहून लक्षात ठेवले की मग चुकायचं कारण नाही. हायवेजचे पुन्हा फेडरल, स्टेट, इंटरस्टेट, एक्सप्रेस, सुपर असे अनेक प्रकार आहेत. एक्सप्रेस आणि सुपर हायवेज वरून तासी ७० ते ८० मैल वेगानं जाता येतं. तरी मोटार खडखडत नाही की उडत नाही. आमचे आजोबा आपल्या घोड्याची तारीफ करताना सांगत असत 'घोडा असा धावतो की पोटातलं पाणी हालत नाही !' बस मधून किंवा मोटारीतून हायवे वरुन जाताना मला त्याचीच आठवण व्हायची. बसेस सुद्धा अतिशय आरामशीर, एअर–कंडिशन्ड असतात. खुर्च्या चांगल्या नरम मागे रेलण्या सारख्या करता येणाऱ्या असतात. पस्तीस सेंटला एक उशी भाड्यानं घ्यायची. म्हणजे रात्री झोपण्याची बरीच सोय होते. सुमारे तीन तासांनी एखाद्या हॉटेल समोर बस थांबते. खाली उतरून पाय मोकळे करता येतात. चहा–कॉफी घेतां येते, कांही आवश्यक गोष्टी उरकता येतात, त्यामुळे कंटाळा येत नाही ब्रेकफास्ट, लंच आणि 'सपर' यांच्या वेळा बरोबर पाळल्या जातात. आपल्या कडच्या सारख तोंड वाळवून घेऊन प्रवास करण्याची पाळी येत नाही.

आम्ही प्रवास केला त्या बसमध्ये अनेक प्रकारचे लोक होते. आमच्या बाजूला आरमारातून निवृत्त झालेला एकजण बसला होता. अतिशय बडबडा आणि मनमोकळा होता. कुणाशीहि कोणत्याहि विषयावर बोलायचा. आमच्याशी मधून मधून बराच बोलत असे. आमच्या समोरच्या खुर्च्यावर एक मुलगा व एक मुलगी बसली होती. मुलगा अकरा वर्षाचा व मुलगी दहा वर्षाची. दोघेहि बहीणभाऊ होते व आपल्या आजी बरोबर आजोळी चालले होते. त्यांची आजी त्यांच्या पुढच्या खुर्चीवर आणखी एका बाईबरोबर बसली होती. तिच्या टोपीतून तिचे पांढरे केस दिसत होते. अमेरिकन म्हाताऱ्या स्त्रियांच्या टोप्या पाहण्या सारख्या असतात. नाना प्रकारचे रंग, झालरी, आकार यामुळे म्हाताऱ्यांच्या टोप्या उठून दिसतात. त्यांची सगळी फॅशन टोप्यांमधे साठवलेली असते. आता तर आम्हांला त्यांच्या टोप्याचं हसूंच येतं. आमच्या समोर बसलेल्या मुलांनी आमचं लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला व त्यात यश मिळवलं. थोड्याच वेळात ती दोघंहि आगाशेशी दांडगाई करायला लागली. कांही वेळातच त्यांनी आगाशेला तुझी गर्ल फ्रेंड कुठे आहे म्हणून विचारलं आणि आपल्या गर्ल व बॉय फेंडसची नावं सांगितली. आरमारातून निवृत्त झालेल्या म्हाताऱ्यालाहि त्यांनी त्याच्या गर्लफ्रेंड विषयी विचारलं, ही अमेरिकेची संस्कृतीच आहे. आम्हांला गर्लफ्रेंड नाही म्हटलं तर कुणाला खरंच वाटत नाही. तुम्ही राहूच कसे शकता

गर्लफ्रेंड शिवाय असं विचारतात. आगाशे कधी कधी 'माझी गर्लफ्रेंड हिंदुस्थानात आहे' म्हणून सांगतो. एकानं मला एकदा फारच खोदून विचारलं तेव्हां मी सांगितलं 'मला एक गर्लफ्रेंड होती पण तिच्याशीच मी लग्न केल्यामुळे आता ती फ्रेंड राहिली नाही' तेव्हां तो खूप हसला.

साल्ट लेक सिटीला जाताना आम्ही सबंध मिसूरी राज्य पूर्व-पश्चिम ओलांडलं व कॅन्सस, कोलोरॅडो, वायोमिंग ह्या राज्यातून जाऊन उत्तरेकडून यूटाह राज्यात प्रवेश केला. मिसूरी व कॅन्सस ह्या राज्यांचा प्रदेश सपाट मैदानाचा आहे. कुठेहि टेकडी सुद्धा दिसणार नाही. सडकेच्या दुतर्फा शेतं, वागवगीचे आणि कुरणं दिसतात. आता उन्हाळा असल्यामुळे शेतात पिकं उभी नव्हती. कांही ठिकाणी ट्रॅक्टरनं नांगरणी चालू होती. आपल्याकडे उन्हाळ्यात जमीन तयार करतात तसाच प्रकार इथेहि दिसला. कॅन्सस राज्यात सडकेच्या दुतर्फा दूर अंतरापर्यंत जागोजाग पंप वसवलेले दिसले. प्रारंभी आम्ही तिकडे लक्ष दिलं नाही. असे शेकडो पंप दिसायला लागले तेव्हां चौकशी केली. जमिनीतलं तेल काढण्यासाठीं ते पंप वसविण्यात आले होते. कॅन्सस राज्याच्या प्रदेशात तेलाचा भरपूर साठा आहे. कोलोरॅडो राज्यात प्रवेश करताच सृष्टीचं स्वरुप बदललं. जागोजाग डोंगर, पर्वत, दऱ्या व सरोवरं दिसायला लागली. जमिनीचा रंगहि कांहीसा लालसर झाला. सृष्टीसौदर्यासाठी कोलोरॅडो राज्य प्रसिद्ध आहे. वायोमिंग राज्यात तर सपाट प्रदेश आढळणंच कठीण. पर्वत, नद्या, त्यांची खोरी सरोवरं, धवधवे व अरण्यं यांनीच त्या राज्याचा प्रदेश व्यापला आहे. अनेक ठिकाणी सडक पहाडातून गेली आहे व मोठमोठे घाट आहेत. बस अनेक नागमोडी वळणं घेत जाते, पण वेग मात्र पन्नास मैलांहून कमी होत नाही. वायोमिंगमधून यूटाहच्या प्रदेशात आम्ही प्रवेश करीत होतो तो पहाटेचा समय होता. कलत्या खुर्चीवर बसून रात्री झोप घेण्याचा प्रयत्न केला होता. डोळे चुरचुरत होते. आजूबाजूचे प्रवासी अजून पेंगत होते. पण भोवतालचं सृष्टिसौंदर्य इतकं आल्हादकारक होतं की बसमधील ३६ तासांच्या प्रवासाचा शीण नाहीसा झाला. लवकरच मुक्कामाला पोचणार या विचारानंहि मन उल्हसित झालं असावं. सडकेच्या दोन्ही बाजूला उंच डोंगर होते. व मधून मधून सरोवरं लागत असत. चोहोंकडे हिरवंगार होतं. डोंगरमाथ्यावर बर्फ चमकत होता. सेंटलुईला फेब्रुवारी पासून हिमदर्शन झालं नव्हतं आता उन्हाळ्यात बर्फ पाहून मौज वाटली. डोंगरामधून जाणाऱ्या नागमोडी सडकेवरून डौलदार वळणं घेत बस वेगानं धावत होती. सात वाजण्याच्या सुमाराला आम्ही साल्ट लेक सिटीमधे प्रवेश केला. शहराचं प्रथम दर्शन मन प्रसन्न करणारं होतं. शहर अतिशय स्वच्छ व सुंदर वाटलं. आणि प्रथम दर्शनी शहराची पडलेली ही छाप शेवटपर्यंत कायम राहिली.

बस स्टेशनवर माझे मित्र (बंधुराज) श्री. कुलकर्णी आपली मोटार घेऊन आले होते. त्यांची व माझी भेट गेल्या पांच वर्षात झाली नव्हती. त्यांना अमेरिकेला येऊन चार वर्षं झाली होती. त्यांच्या स्वभावात व वृत्तीत पुष्कळ बदल झालेला असणं शक्य होतं. अनेक लोक बदलून जातात. आमचे बंधुराजहि बदलले आहेत की काय अशी शंका माझ्या मनात होती. पण आमच्या भेटी नंतर ती तात्काळ नाहीशी झाली. प्रारंभी चार–दोन वाक्यं आम्ही इंग्रजीत बोललो आणि मग सहजस्फूर्त मायबोलीतून संभाषणाला सुरुवात झाली. पूर्वी सारखेच आम्ही एकमेकांचे बंधुराज आहोत याची खात्री पटली.

या वेळी बस स्टेशनवर घडलेला एक लहानसा प्रकार सांगण्या सारखा व लक्षात ठेवण्या सारखा आहे. प्रत्येक मोठ्या बस स्टेशनवर बस मधून उतरवलेलं सामान लगेज रूममधे नेण्यात येतं. प्रवाश्यांनी तिथे जाऊन पावती दाखवून आपलं सामान घ्यायचं असतं. आम्ही कॉफी घेऊन दहा मिनिटांनी लगेज रूममधे गेलो व सामानाची चौकशी केली. आगाशेची पेटी आली होती पण माझी आली नव्हती. तिथल्या क्लर्कनं आता पेटी येईल म्हणून सांगितलं. आम्ही पंधरा मिनिटं वाट पाहिली पण पेटी आली नाही. काय प्रकार आहे म्हणून बाहेर जाऊन पाहिलं तर एका गाड्यावर माझी पेटी दिसली. जो माणूस पेट्या आणीत होता त्याला शोधलं तर तो दुसऱ्या एका बसमधे पेट्या भरीत होता. त्याला आमची परिस्थिति सांगितली व ही पेटी लगेज रूममधे नेऊन दे किंवा ही पावती घेऊन इथूनच आम्हांला पेटी दे म्हणून म्हटलं. दोन्हीपैकी एकहि करायला तो तयार नव्हता. उतरलेल्या प्रवाश्यांना विनाकरण ताटकळत ठेवू नये याची जाणीव त्याला दिसली नाही. मग कुलकर्ण्यांनी म्हटलं 'आता आपण 'पैरवी' करूं या. इथेहि कधी कधी 'पैरवीनं काम होतं !" पैरवी' हा हैद्राबादचा खास शब्द मी विसरून गेलो होतो. आम्ही दोघेहि तिथल्या अधिकाऱ्याकडे गेलो व त्याला आमची अडचण सांगून आम्हांला साडेआठ वाजता एका कॉन्फरन्सला जायचं आहे असं सांगितलं. मग तो अधिकारी आमच्या बरोबर आला व पावती घेऊन पेटी न्यायला त्यानं परवानगी दिली. नाहीतर आणखी किती वेळ बसावं लागलं असतं कुणास ठाऊक. अमेरिकेतहि पैरवीला महत्त्व आहे.

दहाच मिनिटांत आम्ही कुलकर्ण्यांच्या घरी पोचलो. सौ. कुलकर्णी आमची वाट पहात होत्या. आपल्या परिचयाच्या भारतीय कुटुंबात आल्यामुळे मन प्रसन्न झालं. त्यातून टेपरेकॉर्डरवर मराठी भावगीतांची टेप लावलेली होती. 'मला नागपूरहून हैद्राबादला आल्या सारखंच वाटत आहे' असं मी म्हणताच कांही पदार्थ खाल तेव्हां आणखीनच तसं वाटेल असं आमच्या बंधुराजांनी त्यांच्या नेहमीच्या विनोदी स्वभावानुसार म्हटलं, आणि ते खरंचं होतं. त्या

दिवशी व नंतर आपल्याकडील कितीतरी पदार्थ खाल्ले. आपल्या साध्या पदार्थांना काय चव असते ती अशा वेळी चांगली कळते.

सॉल्ट लेक सिटी यूटाह् राज्याची राजधानी आहे. हा एक प्रकारचा अपवादच आहे. अमेरिकेत कोणत्याहि राज्याची राजधानी त्या राज्यातल्या मोठ्या शहरी नाही. न्यू यॉर्क, शिकागो, सेंट लुई, लॉस एंजेलिस, सानफ्रान्सिस्को ही प्रसिद्ध व मोठी शहरं राजधानीची शहरं नाहीत. औद्योगिक व व्यापारी महत्त्वामुळे ती मोठी झाली आणि महत्त्वाला चढली. आपल्याकडे मात्र राजधानी असण्याला फार महत्त्व देण्यात येतं. शहराचं महत्त्व औद्योगिक प्रगतिवर व त्याच्या स्वच्छतेवर अवलंबून आतं हे आपल्याकडच्या, निदान कांही लोकांना तरी कळलं नाही. सॉल्ट लेक सिटी एक अपवाद आहे असं मी म्हटलं. पण ते सुद्धा फारसं खरं नाही कारण हे शहर मुद्दाम राजधानीचं शहर म्हणूनच वसविण्यात आलं आहे यूटाह राज्यात उद्योगधंदे फारसे नसल्यामुळे सॉल्ट लेक सिटी पेक्षा कोणतंहि शहर मोठं झालं नाही. म्हणून त्या राज्यातील मोठं शहरच त्याची राजधानी बनलं. किंवा त्या राज्याची राजधानीच सर्वात मोठं शहर राहिलं.

यूटाह् राज्याचा इतिहास मनोरंजक व कांहीसा अद्भुत आहे. ख्रिश्चन धर्मामध्ये अनेक पंथ आहेत. त्यापैकी एक 'मॉर्मन' पंथ आहे. ह्या पंथाची स्थापना जोसेफ् स्मिथ् नांवाच्या एका गृहस्थानं ६ एप्रिल १८३० रोजी वयाच्या चोविसाव्या वर्षी केलो. त्या दिवशी तो व त्याचे पांच सहकारी न्यू यॉर्क राज्यातील 'फायट्टे' त्या गांवी एका घरी जमले व त्यांनी 'दि चर्च ऑफ् जीसस् क्राइस्ट ऑफ लॅटर डे सेंट्स्' ह्या चर्चची स्थापना केली. आणि जोसेफ् स्मिथ् मॉर्मन पंथाचा पहिला प्रेषित बनला. जोसेफ् स्मिथला वयाच्या चौदाव्या वर्षीच दैवी प्रकाश दिसला व खरं ज्ञान झालं. मधून मधून त्याला साक्षात्कार होत असे. एकदा मोरोनी नावाच्या प्राचीन आत्म्यानं त्याला भेट देऊन एका प्राचीन ग्रंथाची माहिती सांगितली मोरोनीनं सांगितलेल्या खाणाखुणावरून जोसेफ स्मिथनं तो सुवर्णपत्रावर लिहिलेला ग्रंथ एका पहाडातून खणून काढला. त्याच पेटीत ग्रंथ कसा वाचावा याची किल्ली त्याला सापडली. त्या किल्लीच्या आधारान व मधून मधून होणाऱ्या साक्षात्काराच्या सहाय्यानं जोसेफ् स्मिथंन त्या ग्रंथाचं भाषांतर केलं व त्याला 'बुक ऑफ् मॉर्मन्स' हे नांव दिलं. म्हणून त्याच्या पंथाला मॉर्मन पंथ म्हणतात. मॉर्मन पंथी लोक बायबल व ख्रिस्त यांना मानतातच. पण त्यांचं म्हणणं असं की बायबल हा शेवटचा शब्द नाही आणि ख्रिस्त हा शेवटचा प्रेषित नाही. ईश्वर मधून मधून अनेकांना प्रेरणा देत असतो व पूर्वी माहीत नसलेलं ज्ञान नव्यानं देत असतो. आणि तो असंच शेवट पर्यंत करीत राहणार

म्हणून जोसेफ् स्मिथला ते नवा प्रेषित मानतात व बुक ऑफ् मॉर्मन्सला नवा प्रकाश देणारा ग्रंथ मानतात.

मॉर्मन्सच्या श्रद्धेविषयी किंवा त्यांच्या पंथा विषयी मला कांही म्हणायचं नाही. पण जोसेफ् स्मिथचं चरित्र वाचताना अशा अनेक कथा आल्या की त्याच जर हिंदु धर्मग्रंथांत आल्या असत्या तर हेच लोक कुचेष्टेनं हसले असते. हेच काय त्यांचं अनुकरण करून हसणारे आपल्याकडे काय थोडे थोडके आहेत ? अमेरिकन लोक विज्ञानात इतके पुढे गेले आहेत तरी धार्मिक बावतीत अजून पूर्वी सारखेच आहेत. हे चांगलं का वाईट हे मला इथं सांगायचं नाही. पण आपण आपल्याला फार मागासलेले, धर्मभोळे, अंधश्रद्ध समजतो. तशी वस्तु-स्थिति नाही. गाईला मारू नका म्हटलं की माणूस धर्मभोळा ठरावा आणि सागरी बगळयाला कृतज्ञ राहा म्हटलं तर भोळा ठरू नये ह्या दुहेरी न्यायाचं आश्चर्य वाटतं. अजून आपण 'आपण' झालो नाही हाच याचा अर्थ.

युरोपातून अमेरिकेत वसाहत करण्यासाठी जे लोक प्रारंभी आले ते युरोपातील धर्मच्छळाला कंटाळून आले. स्वाभाविकपणेच त्यांनी धर्मस्वातंत्र्याचा (म्हणजे ख्रिस्ती धर्मांतर्गत पंथ स्वातंत्र्याचा) अमेरिकेत डंका पिटविला. पण हे स्वातंत्र्य किती बेगडी होतं याचा प्रत्यय मॉर्मन लोकांना लवकरच आला. मॉर्मन पंथीयांचा अतिशय छळ करण्यात आला. एकेक प्रदेश सोडून त्यांना पश्चिमेकडे जावं लागलं. पूर्वेकडची जुनी राज्ये सोडून ते पश्चिमेकडच्या नव्या प्रदेशात गेले. तिथूनहि त्यांची हकालपट्टी झाली. न्यूयॉर्क, ओहायो, मिसूरी व इलिनॉय् या चार राज्यात त्यांनी वस्ती केली व त्यांना ती सोडावी लागली. इलिनॉय राज्यात तर जोसेफ् स्मिथचा व त्याच्या भावाचा खून करण्यात आला. त्या नंतर मॉर्मन पंथीयांचा दुसरा प्रेषित व पुढारी ब्रिघॅम यंग याच्या नेतृत्वा-खाली हे लोक आणखी पश्चिमेकडे निघाले. आणि ओसाड व डोंगराळ प्रदेशात आले. हा प्रदेश कुणालाहि नको असलेला प्रदेश आहे असे म्हणून साल्ट लेकच्या परिसरात ब्रिघॅम यंगनं एका ठिकाणी उभं राहून 'धिस् ईज् दि प्लेस' म्हटलं व तिथे साल्ट लेक सिटी शहर वसविलं. ही घटना २४ जुलै १८४७ या दिवशी घडली. वरील वाक्य ज्या ठिकाणी उभं राहून ब्रिघॅम यंगनं उच्चारलं त्या ठिकाणी आज एक मोठा स्मारक स्तंभ आहे. त्याच्यावर ब्रिघॅम यंग व त्याच्या दोन सहकाऱ्यांचे पुतळे आहेत. त्याला 'धिस् ईज् दि प्लेस मॉनुमेंट' म्हणतात. हळूहळू मॉर्मन्सनी सर्व साल्ट लेक व्हॅली वसविली, वाळवंटाचं नंदनवन केलं आणि यूटाह राज्याची स्थापना केली. यूटाहला १८९६ मधे अमेरिकेच्या संघराज्यात सामील करून घेण्यात आलं. संघराज्यात सामील करून घेण्यापूर्वी अनेक अटी संघसरकारनं यूटाहच्या सरकारवर लादल्या. त्यात मुख्य म्हणजे

बहुपत्नित्वाची चाल बंद करणे ही होती. मॉर्मन्समधे एकाच वेळी अनेक पत्न्या करण्याची पद्धत होती. एका पुढाऱ्याचा सतरा बायकांचा जनानखाना होता म्हणतात.

आता मॉर्मन पंथीयांचा छळ होत नाही तरी त्यांना कमी लेखण्यात येतं. ही जमात फार कष्टाळू, श्रीमंत व एक प्रकारे धर्मवेडी आहे. आपल्या पंथाचा ते जारीने प्रसार करतात. प्रत्येकाला आपल्या उत्पन्नाचा ठराविक हिस्सा चर्चला द्यावा लागतो. त्यांच्या धार्मिक समजुतीहि फार कडक आहेत. सौ. कुलकर्णी यांची एक मॉर्मन मैत्रिण आहे. ती तेहतीस वर्षांची असून विधवा आहे. तिला पुन्हा लग्न करायचं आहे पण जमत नाही म्हणून ती सारखी काळजी करीत असते. कारण काय तर निपुत्रिकाला स्वर्ग मिळत नाही ही मॉर्मन पंथीयांची धार्मिक श्रद्धा. तिला किंवा इतरांना आपण कांही मागासलेले आहोत असं वाटत नाही. आम्हांलाहि नुसती गंमतच वाटली. एखाद्या भारतीय महिलेनं अशी चिंता व्यक्त केली असती तर पहिला विचार आला असता तो हा की 'काय मूर्ख बाई आहे ही'. म्हणून मला कधी कधी असं वाटतं की अमेरिकनांनी (किंबहुना साऱ्या गोऱ्यांनी) कांही तरी पुण्य केलं असावं त्या शिवाय त्यांच्या सर्वच गोष्टींचं कौतुक होतं ना !

मागे सागरी बगळयाचा (Sea Gull) उल्लेख केला आहे. त्याची थोडी हकीगत सांगणं आवश्यक आहे. १८४८ मध्ये मॉर्मन्स वसाहतवाल्यांनी साल्ट-लेकच्या प्रदेशात धान्य पेरलं. त्यांच्या मेहनतीनं पीक भरघोस आलं. पण तेवढ्यात टोळधाड आली. लोकांनी अनेक प्रयत्न केले पण पिकांचा बचाव होईना. एकदोन दिवसातच सर्व ओसाड झालं असतं. शेवटचा उपाय म्हणून लोकांनी प्रार्थना केली. प्रार्थना संपते न संपते तोच बगळयांचे आवाज यायला लागले. हजारो बगळे आले व त्यांनी धान्याला धक्का न लावतां सर्व टोळांचा नाश केला व पिकाचं रक्षण केलं. बगळे आले तसेच परत गेले. तेव्हा पासून युटाह राज्यात बगळा हा पवित्र पक्षी आहे. त्याची शिकार करीत नाहीत. त्याचा कृतज्ञतेनं उल्लेख करतात. साल्ट लेक सिटीमधील मॉर्मन टेंपलच्या आवारांत 'सी गल् मॉनुमेंट' आहे. तियला वाटाड्या बघणारांना सर्व प्रथम तेच दाखवतो व वरील कथा पूर्ण श्रद्धेनं सांगतो. कथेच्या शेवटी 'हें खरं असेल किंवा नसेल,' 'असं म्हणतात' असली वाक्यं तो उच्चारीत नाही, किंवा स्वतःचा विश्वास नसल्याचं दाखविणारं हंसूंहि चेहऱ्यावर आणीत नाही.

साल्टलेक सिटी हे मुद्दाम वसविलेलं शहर असल्यामुळे अगदी आंखीव व रेखीव आहे. मॉर्मन टेंपलला मध्यबिंदू मानून त्याच्या चोहोकडे समांतर रस्ते व घरं बांधण्यात आली आहेत. प्रत्येक रस्त्याला व घराला नंबर आहे.

अनुक्रमणिका

रस्त्याला बहुधा नांवं नाहीतच. एकहि सडक नागमोडी वळणाची नाही. एका काळी ओसाड वाळवंट असलेल्या प्रदेशांत आज सुंदर बागबगीचे व वृक्षराजि यांनी सुशोभित असं हे शहर वसलेलं आहे. शहर पहाताच मन प्रसन्न होतं. इमारती सामान्यतः तीन किंवा दोन मजलीच आहेत. दोनचारच इमारती दहा ते पंधरा मजल्यांच्या दिसल्या. त्यामुळेहि शहर जास्त सुंदर वाटतं. न्यूयॉर्क किंवा शिकागो ही शहरं उंचउंच इमारतींमुळे कांहीशी भयानक वाटतात. साल्टलेक सिटी हे मध्यम वर्गीयांचं शहर आहे. त्यामुळे स्वच्छता व टापटीप चांगली आहे. शहरात गुन्ह्यांचं प्रमाणहि कमी आहे. ऑफिसला जाताना बहुतेकजण घराला कुलूप लावीत नाहीत असं कळलं. आम्हांला थोडं आश्चर्य वाटलं. सेंट लुईला कुलूप लावलं तरी चोरी होते. आणि साल्टलेकला दारं उघडी ठेवली तरी चोरीचं भय नाही हे कसं काय? याचं कारण असं सांगण्यात आलं की लोक फार धार्मिक आहेत (मॉर्मन म्हणून) आणि नीग्रोंची वस्ती नाहीच म्हटलं तरी चालेल. बहुतेक गुन्हे नीग्रो जमातीचे लोक करीत असतात असं सांगण्यात येतं. ते खरं असेलहि. पण त्याला जबाबदार ती जमात नसून त्या जमातीला मिळणारी वागणूक व त्यामुळे निर्माण झालेली त्यांची आर्थिक परिस्थिति कारणीभूत आहे.

साल्ट लेक सिटी मध्ये मॉर्मन टेंपल, धिस् इज् दि मॉनुमेंट, कॅपिटॉल बिल्डिग (म्हणजे राज्य विधिमंडळाची इमारत) युनिव्हर्सिटी आणि पायोनिअर विलेज ही प्रेक्षणीय स्थळं आहेत. त्या शिवाय शहर फेरफटका मारून पाहण्या सारखं आहे. धिस् इज् दि मॉनुमेंट पाहायला गेलं की भोवतालची सृष्टिशोभा चांगली दिसते. शहराच्या भोवताली डोंगर आहेत. डोंगर व त्यांच्या दऱ्या हिरव्यागार वृक्षराजीनं भरलेल्या असतात. डोंगरमाथ्यावर उन्हाळ्यात देखील बर्फ चमकत असतो. हे सर्व दृश्य डोळ्यांना फार सुखविणारं आहे. कॅपिटॉल बिल्डिग वॉशिंग्टन शहरातील कॉंग्रेसच्या इमारती सारखीच आहे सर्व राज्यातल्या विधिमंडळाच्या इमारती त्याच नमून्याच्या आहेत म्हणतात. कॅपिटॉल बिल्डिग उंच टेकडीवर असल्यामुळे शहराच्या कोणत्याहि भागातून दिसते. त्या इमारती जवळून शहराची शोभा रात्रीच्या वेळी अवर्णनीय अशी दिसते. शहरात जणू काय दिवाळी आहे असा भास होतो. जिकडे पाहा तिकडे निरनिराळ्या प्रकारचे दिवे चमकताना दिसतात. दिव्यांच्या रांगा मधून सरळ रेषेंत असलेल्या सडका व त्यावरून धावणारी वाहनं अतिशय सुंदर दिसतात. युनिव्हर्सिटीचं कॅंपसहि फार मोठं व सुंदर आहे. पण सेंट लुईच्या वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीचं कॅंपस मला जास्त भव्य वाटतं. यूटाह युनिव्हर्सिटी सरकारी युनिव्हर्सिटी असल्यामुळे तिथे फी बरीच कमी आहे म्हणून विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे.

प्रत्येक राज्यात एक तरी स्टेट युनिव्हर्सिटी असते. तिथे फी कमी असते व विद्यार्थ्यांची संख्या जास्त असते.

'पायोनिअर विलेज' हा एक स्मरणात राहण्या सारखा भाग आहे. शे–सव्वाशे वर्षांपूर्वी साल्ट लेक व्हॅलिमध्ये जे 'पायोनिअर' मॉर्मन्स आले ते कसे राहात होते, त्यांचो घरं, दुकानं, शाळा, दवाखाने, वाहनं, वेप, घरातली भांडीकुंडी वगैरे कशी होती ते तिथे पाहायला मिळतं. त्यावेळची प्रत्यक्ष घरंच निरनिराळ्या ठिकाणाहून जशीच्या तशी आणून एक गांव तयार करण्यात आलं आहे ते एक नांदतं गांवच आहे असं वाटतं. तिथल्या एका दुकानात शंभर वर्षांपूर्वी त्या दुकानात असलेल्या वस्तू जशाच्या तशा ठेवल्या आहेत. शाळेतली बाकं, खुर्च्या, बोर्ड वगैरे तसेच ठेवण्यात आले आहेत ते पाहताना आपण शंभर वर्षांपूर्वी या साल्ट लेक व्हलीच्या गांवातून जात आहोत असं वाटतं. तिथे दोन तीन विशेष गोष्टी पहायला मिळाल्या. मेडिकल स्टोअरमध्ये जी चित्रं होती त्यात प्राचीन भारतातील शल्यकर्मावर कांही चित्रं होती व एका चित्रात सुश्रुत शस्त्रक्रिया करीत आहे असं दाखविलं होतं. आणि दुसरं एका चिनी मातीच्या झाकणावर ताजमहालाचं चित्र होतं. सुश्रुताचं चित्र व चिनी मातीचं भांडं कुणी तयार केलं होतं ते कळलं नाही. ज्यांना इतिहासाचं महत्व कळत नाही त्यांना तिथं कांही मौज वाटणार नाही. पण जाणता प्रवासी ते ठिकाण पाहिल्या शिवाय राहणार नाही.

साल्ट लेक सिटीच्या परिसरात अनेक प्रेक्षणीय स्थळं आहेत त्यात मुख्य म्हणजे खुद्द साल्ट लेक हे खाऱ्या पाण्याचं सरोवर आणि तांब्याची खाण. आश्चर्य असं की ही दोन्ही ठिकाणं सहज पाहतां येण्या सारखी असूनहि आम्ही पाहिली नाहीत. कधी कधी सोप्या गोष्टी अनवधानाने व योजना न केल्यामुळे करायच्या राहून जातात. आमचं तसचं झालं. आठशे मैलांवरचं लॉस एंजेलिस पाहून आलो, पण पंधरा–वीस मलावरील ही ठिकाणं पाहायची राहून गेली. साल्ट लेकचं पाणी अतिशय खारट आहे म्हणतात. जगातलं असलं सरोवर हेच आहे म्हणतात. पाणी इतकं खारट आहे की माणूस आत बुडत नाही म्हणतात. तांब्याची खाणहि इतर खाणी सारखी बंद नसून उघडी आहे म्हणतात. प्रत्यक्ष पाहिलेली नसल्यामुळे नक्की काय आहे ते सांगता येत नाही.

आम्ही साल्ट लेक सिटीला पोंचलो त्या दिवशीच रात्री एका अमेरिकन कुटुंबात जेवायला गेलो होतो. ते कुटुंब हैद्राबादला एक वर्ष राहून गेलेलं होतं. त्यामुळे माझे मित्र श्री. कुलकर्णी व त्या कुटुंबातील मंडळी एकमेकांच्या चांगल्या संबंधातली होती. म्हणून आम्हा सर्वांना त्यांनी जेवायला बोलावलं होतं.

(पृष्ठ १९ वर)

कृष्णदयार्णवांचा 'हरि-वरदा'

—प्रा. भा. श्री. परांजपे

'अमंगला'चा नाश करणारा प्रासादिक ग्रंथ

श्रीकृष्णदयार्णव या पेशवेकालीन प्रसिद्ध सत्पुरुषाच्या हरिवरदा ग्रंथाचा आठवा खंड नुकताच प्रकाशित झाला आहे. त्यामुळे या बृहद् ग्रंथाचे एकाकी व संपूर्ण अवलोकन करण्याच्या दृष्टीने मराठी वाचकांची पुन्हा एकदा चांगली सोय झाली असे म्हणावयास हरकत नाही. या ग्रंथांचे प्रकाशक श्री. दयार्णव कोपर्डेकर हे स्वतः श्रीमत्कृष्णदयार्णवांचे वंशज असून आपल्या पूर्वजांचे ऋण फेडण्याच्या इच्छेने या महत्कार्यास प्रवृत्त झाले होते. १९५५ सालापासून सुरू झालेल्या या अवाढव्य कार्याची परिसमाप्ति व्हायला जवळ जवळ आठ वर्षे लागली आणि शेवटी चालू वर्षी एकूण ४२४८७ ओव्यांचा व २१०६ पृष्ठांचा हा बृहद्टीकाग्रंथ पुरा करून प्रकाशक एका दीर्घ व्रताची सांगता करावयास मुक्त झाले ही मोठ्या आनंदाची गोष्ट म्हटली पाहिजे. आज प्रकाशित झालेल्या ८ व्या खंडासकटचा हा ८ विभागांचा टीकाग्रंथ प्रकाशकांच्या पूर्वजप्रेमाची उत्कट साक्ष देणारा ठरेल.

पूर्वी एकदा प्रसिद्ध झालेल्या पण सध्या दुर्मिळ असेलेल्या ग्रंथाचे पुनः प्रकाशन एवढेच या ग्रंथाचे स्वरूप असते तरी ते चालू परिस्थितीत कौतुकास्पद मानून घ्यावे लागले असते. पण या ग्रंथाला केवळ 'आधुनिक' मुद्रणाचा संस्कार लाभलेला नाही तर उत्तम संपादनाची जोडहि मिळाली आहे. श्री. शं ना. जोशी हे पहिल्या व डॉ. वसंतराव राहूरकर हे दुसऱ्या व तिसऱ्या खंडाचे संपादक होते. तर उरलेल्या पाच खंडांचे (खंड ४ ते खंड ८) संपादन श्री. रा. चिं. ढेरे यांचे आहे. या तिन्ही संपादकात श्री. ढेरे हे दयार्णवांच्या सान्निध्यात विशेष रंगलेले दिसतात आणि त्यामुळे त्यांच्या प्रस्तावना विशेष विवेचक ठरल्या आहेत. कृष्ण-दयार्णवाबद्दल बऱ्याचशा नव्या माहितीची भर त्यांनी घातली आहे आणि त्यांच्या साहित्यरसाचे द्रोणहि भरभरून त्यांनी वाचकापुढे ठेवले आहेत. या दोन्ही दृष्टींनी त्यांच्या प्रस्तावना अभ्यासकांना विशेष उद्बोधक ठरतील.

कृष्णदयार्णवांच्या ग्रंथरचनेचे साधारण वाचकाला विशेष कौतुक वाटते ते रचनेच्या मागे असलेल्या पार्श्वभूमीचे होय. वय पन्नाशीच्या पुढे झुकलेले आणि शरीरात महारोगाने जबर ठाणे दिलेले अशा उदास अवस्थेत पैठणला नाथांचा दृष्टांत झाला की रोगपरिहार हवा असेल तर दशमस्कंधावर मराठीत टीका

लिही. नायांच्या या प्रेरणेला संतसज्जनांची आणि गुरुचीहि अनुमति मिळाली आणि म्हणून वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षी कृष्णदयार्णवांनी या बृहद्ग्रंथास हात घातला. वस्तुतः दयार्णवांचा हा अभ्यासाचा व आवडीचा विषय होता. 'दशमस्कंधा'वरील त्यांची व्याख्याने महाराष्ट्राला परिचित व आवडती होती. किंबहुना हा ग्रंथ समजून घ्यायचा तर तो एकटया कृष्णदयार्णवाकडून असा त्यांचा लौकिक या काळात आसपासच्या वातावरणात झालेला होता. पण बहुधा त्यांच्या विनम्र वृत्तीमुळे ग्रंथलेखनाच्या बाबतीत शिस्तीने इतकी वर्षे माघार घेतली होती. पण 'रोगपरिहारार्थ एक दिव्य रसायन' या नव्या जाणिवेने त्यांनी श्रद्धाळु मनाने हा दृष्टांत आज्ञेसारखा सेव्य मानला. कृष्णदयार्णवांच्या या ग्रंथाला त्यांनी हरीची कृपा म्हणून 'हरिवरदा' हे नांव दिले. प्राचीन संतसाहित्यात 'वरद' ही ग्रंथाची फार मोठी कसोटी मानली जाते आणि योगायोग असा की खुद्द दयार्णवांच्या बाबतीत ही टीका खरोखच 'वरदायिनी' ठरली. ग्रंथाचा पूर्वार्ध ७ वर्षांनी संपला आणि त्याबरोबरच दयार्णवांची रोगव्याधीहि पळाली ! संस्कृतात मम्मटाने 'अमंगलाचा नाश' हे काव्याचे एक प्रयोजन म्हणून दिले आहे तसेच ते 'वरद' या लक्षणातहि समाविष्ट आहे हे सांगावयास नको. परंतु या लक्षणाची सद्य: प्रतीति व नेमकी फलश्रुति ग्रंथकाराला 'याचि देही याचि डोळा' अनुभवायला मिळाली. संतसाहित्यात दयार्णवांच्या 'हरिवरदे'चे विशेष कौतुक होते ते यामुळेच !

समरवर्णनांना आलेला डौल

पूर्वार्धाची समाप्ति झाली तेव्हा कृष्णदयार्णवांचे वय साठीला येऊन टेकले होते. प्रेमळ व प्रेरक श्रोते दुरावले होते. शरीरहि थकले होते. अशास्थितीत मन निरुत्साही झाले असल्यास नवल नाही. पण ते फारच थोडा वेळ ! कारण बाहेरची परिस्थिति म्हणाल तर स्वच्छ व लखलखीत, प्रसन्न व प्रेरक होती. शिवप्रभूंचे स्वराज्य बरेच परत दृढावू लागले होते. इतकेच तव्हे तर मराठयांच्या पराक्रमाचे चौघडे बाजीरावाच्या स्वाऱ्यांच्या रूपाने दिशादिशाला झडत होते आणि खुद्द कृष्णकथेच्या (भागवताच्या) उत्तरार्धातील प्रसंग अशा शौर्यप्रसंगांनीं भरलेले नव्हते काय ?

श्री. ढेरे यांच्या मते शिवकालीन पराक्रमाचे जे डिंडिम निनादत होते त्याचे पडसाद दयार्णवांच्या या समर वर्णनात उफाळून आले आहेत. परंतु आम्हाला तसे वाटत नाही. या मागल्या परंपरेप्रमाणेच वर्तमानाचे तेजस्वी स्फुरण कृष्णदयार्णवांच्या वाणीला आवाहन करण्यास कारण झाले असावे. इतकेच नव्हे तर आतापावेतो विशेषेकरून न आळविलेला वीररस या दशमाच्या उत्तरार्धात आळवायला मिळाल्यामुळेहि ते स्फुरण अधिक प्रकर्षाला पावले आणि म्हणूनच कांहीशा

उदास अवस्थेत पूर्वार्ध संपविल्यानंतर अवघ्या तीन महिन्याच्या आत त्यांनी उत्तरार्धाला हात घातला मात्र, सुरवातीपासूनच या समरवर्णनाला हां हां म्हणता विलक्षण डौल चढत गेला. उत्तरार्धातील ५० ते ५२ हे जरासंधाच्या स्वारीच्या प्रकरणाचे अध्याय या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत. भक्तिरसाप्रमाणे वीररसहि दयार्णवांचा आवडता रस होता आणि त्याचा विशेष उत्कर्ष जर कुठे झाला असेल तर तो दशमस्कंधाच्या उत्त ार्धात होय.

कृष्णचरित्रातील सतत धगधगणार समरकुंड

कंसवधानंतर जरासंधापासून वक्रदंतापर्यंत एकाहून एक प्रबल राजांची श्रीकृष्णाशी युद्धात गाठ पडत होती. खुद्द त्यांच्या स्वतःच्या विवाहाच्या प्रसंगातहि या ना त्या रूपाने हे 'समरसूत्र' कायम होते. कृष्ण-पुत्र प्रद्युम्न आणि नातू अनिरुद्ध यांच्या लग्नप्रसंगातहि हे समरप्रसंग चुकले नाहीत. रुक्मिणीच्या तान्ह्या बाळाला जन्मतःच उचलून न्यायला वैऱ्यांनी कमी केले नव्हते. एकंदरीत कंसवधानंतर जरासंध-कालयवनाच्या आक्रमणापासून तो वक्रदंत विदूरथांच्या वधापर्यंत हे समरकुंड सारखे धगधगत असलेले दिसते.

कृष्णदयार्णवांनी या समर चमत्काराचे चित्रण करताना महाराष्ट्रातील आपल्या भोवतीचे युद्धनिनाद त्यात मिसळून दिलेले आहेत आणि म्हणूनच कालयवनाच्या स्वारीच्या वेळी सैन्यात स्त्रियांचा काफिला घेऊन येणारे यवन जसे दिसतात तसेच प्रसंगी लूट टाकून शत्रूला भुलवीत दूर नेण्याचे अद्‌भुत पलायन-तंत्रहि आढळते. कित्येक ठिकाणी शत्रूंच्या पराभवाची वर्णने करताना तर 'दीन दीन' 'अल्ला अल्ला' असा आधुनिक आक्रोश आपल्या कानावर आदळतो. परंतु शत्रूच्या पराभवाप्रमाणेच प्रसंगी त्याच्या आंगच्या पराक्रमाचे वर्णन करावयास दयार्णव विसरत नाहीत. किंबहुना त्या वर्णनाच्या मागे त्यांचा एक निश्चित दृष्टिकोन आहे आणि तो कोणत्याहि वीररसाधिष्ठित वाङ्मयाला साजेसाच आहे. जेवढा शत्रु प्रबल व प्रतापी असेल तेवढे त्याला जिंकणाऱ्या वीराचे यश जास्त आणि म्हणूनच अशा वीराचे पोवाडे गाताना त्याच्या शत्रूचेहि पराक्रम वर्णिले तर ते त्या वीराच्या अद्‌भुत चरित्राला पोषकच ठरते. असा दयार्णवांचा या बाबतीतला सिद्धांत आहे तो लक्षात ठेवण्यासारखा आहे.

शृंगार प्रसंगातील गूढ 'राजनीति'

कृष्णदयार्णवांना वीररसाइतकेच शृंगाराचे चित्रण करावयास आवडते आणि ते त्याना साधतेहि! कृष्णदर्शनाने मथुरापुरीच्या स्त्रियांना लागलेला वेध, कृष्णपत्न्यांचे सौंदर्य, श्रीकृष्णानी आपल्या पत्नींशी केलेले विनोदकलह, कृष्ण

पत्न्यांचा विरह यासारख्या चित्रणातून शृंगाराच्या वेगवेगळ्या भावना वर्णिल्या आहेत. सदान् कदा शत्रूशी मुकाबला घ्यायला सज्ज असलेल्या भगवान् श्रीकृष्णासारख्या समर धुरधर व्यक्तीला आपल्या पत्नींशी विलास करावयास भरपूर अंवसर कसा मिळणार ? आपल्या मदनसुदर पतीशी विलास खेळण्यापेक्षा विरहात दिवस कंठण्याचा भोगच कृष्णपत्न्यांच्या कपाळी जास्त असावा हे साहजिक आहे. या दृष्टीनेच भागवतकारांनी अ. ७० मध्ये 'गृहीतकंठयः पतिभिर्माधव्यो विरहातुरा' असे कृष्णस्त्रियांच्या भर्तृविरहशंकेचे जे वर्णन केले आहे ते मार्मिक ठरेल. खुद्द श्रीकृष्णांनी रुक्मिणीशी केलेल्या प्रेमकलहाचा समारोप करताना (अ. ६०)

अयं हि परमो लाभो गृहेषु गृहमेधिनाम्
यन्नर्मैर्नीयते यामो प्रियया भीरु भामिनि (३१).

असे जे उद्गार काढले ते त्यांच्या समरशील जीवनाला धरूनच होत. कृष्णदयार्णवांनी भगवान श्रीकृष्णाच्या शृंगारकथा वर्णिताना कृष्णजीवनाचा हा पैलू नेहमीच लक्षात ठेवला आहे श्रीकृष्णाच्या समरशील जीवनाचे भागवतकारांनी दिलेले मार्मिक उदाहरण म्हणजे अध्याय ५९ मध्ये भामेला घेऊन श्रीकृष्ण भौमासुराकडे युद्धार्थ गेले हे होय. युद्धार्थ स्वस्त्रीला बरोबर नेण्याच्या या प्रसंगातील गूढ राजनीति भागवताच्या टीकाकारांनी फारशी उलगडून दाखविलेली दिसत नाही. कृष्णदयार्णवहि त्याला अपवाद नाहीत. पण या चुकीची भर त्यांनी 'सभार्यः' या शब्दाचा आधार घेऊन जो १७२ ओव्यांचा विस्तृत प्रपंच केला त्याच्या शेवटी केलेल्या समर्थनाने (आः १६६-१६८) थोडासा भरून निघण्यासारखा आहे.

'धर्म मर्यादा' रक्षणारा आदर्श

शृंगार-विलासाच्या प्रसंगीहि धर्ममर्यादेचा विवेक न सोडणाऱ्या कृष्णदयार्णवांच्या दृष्टीचा मी माझ्याच एका लेखात (कृष्णदयार्णवांचा शृंगारविवेक) स्वतंत्रपणे ऊहापोह केला असल्यामुळे त्या गोष्टीचा उल्लेख पुनः या ठिकाणी करणे मला योग्य वाटत नाही. तथापि कृष्णाच्या या धर्ममर्यादापालनाचा प्रभाव त्याच्या कुटुंबियावरहि पडला होता याचे एक उदाहरण मात्र येथे दिल्याशिवाय राहवत नाही. अनिरुद्ध-उषेच्या कथेत (अ. ६२) मूळ श्लोकात (अ. २४) विवाहाचा निर्देश नसताना कृष्णदयार्णवांनी तुंबरूहस्ते त्यांचा विवाह लावून दिला आहे आणि त्याचे कारण सांगताना 'धर्मस्थापक शेषशायी । अविधि गेही वर्तेना (ओ. २५९) अनिरुद्ध तो तयाचा पौत्र अविधि नाचरे अणुमात्र' असे सांगितले आहे.

कृष्णदयार्णवांच्या भक्तिमान् अंतःकरणाचा साक्षात्कार करून देणारा म्हणून प्रस्तुतचा ग्रंथ भाविकांना प्रिय होईल तसाच त्यातील पांडित्यामुळे विद्वानांनाहि होईल. परंतु मूळ भागवतातील श्रीकृष्णाचे धर्मसंस्थापक व दुष्टदंडक चरित्र आणि त्यातील वीररसाच्या आश्रयाने वावरणारे इतर रस याचा विचार न करता भगवान् श्रीकृष्णासारख्या लोकोपकारक महान् व्यक्तीचे मानवी चित्रण कृष्णदयार्णवांनी कसे केले यावर मी मुद्दाम विशेष भर दिला आहे. कारण तोच माझ्या मते या ग्रंथाचा प्रस्तुतच्या काळाला साजेसा सर्वात मोठा विशेष आहे.

तरुणांनो, पश्चिमेकडे जा ! (पृष्ठ १४ वरून)

त्याच वेळी हैद्राबादचे आणखी एक प्राध्यापक श्री. शेषाचारी यांची व आमची ओळख झाली व पुढे ती चांगलीच दृढ झाली. त्या अमेरिकन कुटुंबात बंगलोरच्या (पण सिंधी) एक बाई आपल्या मुलीसह आल्या होत्या. बाई मध्यम वयाच्या व मुलगी सतरा–अठरा वर्षे वयाची. बाई सौभाग्यवती होत्या पण कपाळाला कुंकू नव्हतं व हातात बांगड्या नव्हत्या. साडीच्या ऐवजी फ्रॉक नव्हता हेच नशीब. मुलगी पूर्णपणे पाश्चात्य धर्तीची असणार हे ओघानंच आलं. दोघींनीहि लिपस्टिक् लावली होती. एकंदर आव पाश्चात्यांचा होता. आमची त्यांच्याशी ओळख करून देण्यात आली. आम्ही भारतीय पद्धतीनं नमस्कार केला. पण दोघींनीहि आमच्याकडे पाहिलं सुद्धा नाही. बोलणं तर दूरच. सौ. कुळकर्णी बाईंच्या जवळ बसल्या होत्या. त्यांच्याशीहि बाईसाहेब धड बोलल्या नाहीत. मग आम्ही सर्वांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. आणि त्या दोघी आल्या होत्या कशाला तर बाईंचा भाऊ बी. ए. ची पदवी घेणार होता तो समारंभ पहायला. श्री. कुळकर्ण्यांनी म्हटलंहि 'तुम्हाला परदेशी चलन कसं मिळालं?' त्यावर अमेरिकनांची नक्कल करीत खांदे उडवून बाई म्हणाल्या, 'Well it is very easy. You apply and you get.' मला शंभर डॉलर नेण्याची सुद्धा परवानगी मिळाली नव्हती याची आठवण मी विसरलो नव्हतो. अशी कितीतरी भारतीय स्त्री 'रत्नं' आणि 'नरपुंगव' अमेरिकेत व युरोपात संचार करीत आहेत!

(अपूर्ण.)

संस्कृत व्याकरणावरील सुभाषिते

—प्रा. ग. मो. पाटील, नागपूर.

आज जरी संस्कृत भाषेची दुरवस्था होत असली आणि व्याकरण या विषयाबद्दल सामान्यतः विद्यार्थ्यांत आणि जनतेत अनास्था आढळत असली तरी एका काळी या भारतवर्षात संस्कृत भाषा आणि तिचे व्याकरण हे विद्वत्तेचे निकष मानले जात असत. राजदरबारी संस्कृत साहित्याला मान तर होताच पण व्याकरण विषयाचा पंडित म्हटला की त्याचा विशेष गौरव होत असे. व्याकरणाचे महत्व विशद करणारा पुढील श्लोक फार प्रसिद्ध आहे.

यद्यपि बहु नाधीषे तथापि पठ पुत्र व्याकरणम्।
स्वजनः श्वजनो मा भूत्सकलं शकलं सकृच्छकृत् ॥

"मुला, जरी फार काही शिकला नाहीस तरी व्याकरण मात्र अवश्य शीक. कारण तुजकडून स्वजनाच्या बदली श्वजन (कुत्रे) म्हटले जाऊ नये. सकल (संपूर्ण) म्हणावयाचे असले तर शकल (तुकडे) पडू नयेत आणि सकृत् (एकवार) म्हणावयाच्या ठिकाणी शकृत् (विष्ठा) म्हटले जाऊ नये". भाषेच्या वापरामधली ही उच्चारशुद्धता मार्मिकपणे या ठिकाणी दर्शविली गेली आहे. संस्कृत व्याकरणावर आधारित अनेक सुभाषिते संस्कृत भाषेत प्रचलित असून त्यातील काहींचा खाली परिचय करून दिला आहे.

एक गरीब ब्राह्मण राजदरबारी गेला आणि राजासमोर उभा राहून त्याला गंभीरवाणीने म्हणाला.

अहं च त्वं च राजेन्द्र लोकनाथावुभावपि।
बहुव्रीहिरहं राजन् षष्ठीतत्पुरुषो भवान् ॥

"हे राजश्रेष्ठा, मी आणि तू आपण दोघेहि लोकनाथ आहोत. फक्त तुझ्या बाबतीत षष्ठी तत्पुरुष समास आहे तर माझ्या बाबतीत तो बहुव्रीहि समास सोडवावयाचा आहे" लोकांचा नाथ आणि लोक आहेत नाथ ज्याचे अशा प्रकारे एका सामासिक शब्दाचा दोन प्रकारे विग्रह करून त्याने आपली स्थिति राजासमोर निवेदन केली. राजा त्याच्या या चतुरपणाबद्दल खूष झाला आणि त्याने ब्राह्मणाचा आदरसत्कार करून त्याला परत पाठविले.

अनुक्रमणिका

दुसरा असाच एक दरिद्री परंतु विद्वान आणि बुद्धिमान पंडीत एक राजसभेत गेला आणि त्याने आपली स्थिति निवेदन केली ती पुढील श्लोकानेः— ।

द्वन्द्वो द्विगुरपि चाहं मद्गेहे नित्यमव्ययीभावः ।
तत्पुरुष कर्मधारय येनाहं स्यां बहुव्रीहिः ॥

संस्कृत भाषेतील समासांच्या नामावलीतून त्याने मोठ्या चतुराईने आपले दारिद्र्य व्यक्त केले. तो म्हणतो; "घरी आम्ही पतिपत्नी दोघेच (द्वन्द्वः) आहोत. माझ्या जवळ दोन गाई (द्विगुः) आहेत, पण माझ्या घरी (दारिद्र्य इतके आहे की) कधी खर्चच होत नाही (अव्ययीभावः). तेव्हा हे श्रेष्ठ पुरुषा (तत्पुरुष), तू माझे दैव असे घडीव (कर्म धारय) की ज्यामुळे माझ्याकडे धनधान्यवृद्धि (बहुव्रीहिः) होईल." या श्लोकातील अर्थ समजल्यानंतर कोणता रसिक मर्मज्ञ प्रसन्न होणार नाही ? राजाने ब्राह्मणाला त्याची गरिबी दूर करून त्याला प्रसन्न केले तर त्यात काय नवल ?

तिसरी कथा विनोदी तर आहेच पण रसपूर्णहि आहे. एका गावात एका पंडिताची एक उपवर कन्या होती. ती रूपयौवनसंपन्ना तर होतीच पण शिवाय पंडिताने तिला व्याकरणशास्त्रचतुर करून ठेवले होते. तिची लग्नाची अट इतकीच होती, की व्याकरणशास्त्रात तिचा पराभव करणाऱ्या तरुणाशी ती लग्न लावणार होती. अर्थात आजुबाजूच्या गावात तिच्या पांडित्याची कल्पना असल्यामुळे कोणी तरूण हे साहस करावयास धजला नाही. एके दिवशी दूरच्या गावाहून आलेल्या एका तरुणाला ही वार्ता समजली आणि तो गंमत म्हणून तिची मागणी करण्यास गेला. तेव्हा त्याला लग्नाची अट समजली त्याने आठ दिवसांचा अवधी मागून घेतला आणि निवासस्थानी परतला. त्याची कल्पना फार चुकीची होती. त्याला वाटले बाईमाणूस शिकून शिकून काय शिकणार ? आणि दुसरे म्हणजे संस्कृत व्याकरण ही सामान्य गोष्ट आहे. पंधरावीस रुपे पाठ असली की काम भागेल ! त्याने देवाचे नाव घेतले आणि मोठ्या हिरिरीने "रामः, रामौ, रामाः" पाठ करावयास सुरवात केली. आठ दिवसात जेमतेम राम शब्द चालवावयास शिकून तो त्या तरुणीकडे परतला. "होऊ द्या वाद !" त्याने आव्हान दिले. त्या तरुणीने त्याला एक रूप विचारले. "विहस्य हे कोणते रूप ?" "किती सोपे विचारलेत हो तुम्ही ? रामस्य तसे विहस्य; विह शब्दाचे षष्ठीचे एकवचन !"

"शाबास," ती पंडिता उद्गारली. "आणि 'विहाय' हे कसले रूप ?"

"हे तर अगदीच सोपे" त्या तरुणाचा धीर चेपला. त्याला वाटले आपली कल्पना किती बरोबर आहे. पंडिताची झाली म्हणून काय झाले, किती हुशार

(पृष्ठ २५ वर)

चर्चा

'उधो माधो'...की दौर

--प्रा. दा. ल. अडोणी

'केसरी'च्या दि. २१-९-६२ च्या अंकातील 'पत्रव्यवहारा'त डॉ (प्रा.) र. वि. हेरवाडकर यांनी 'भाऊसाहेबांच्या बखरी'तील (म्हणून काहींनी मानलेल्या) दोह्याबावत एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला 'प्राचीन मराठी गद्य' या 'पाठ्य पुस्तकाची कहाणी' म्हणून जो टीकात्मक लेख त्याआधी 'केसरी'त प्रसिद्ध झाला होता, त्यामुळे प्रस्तुत अर्थचर्चेला तोंड फुटले असे म्हटले तरी चालेल. 'भाऊ-बखरी'तील ज्या दोह्यावरील टीपेबद्दल आणि पर्यायाने ज्याच्या अर्थासंबंधी डॉ साहेबांनी लिहिले, तो बखरीतील भाग-कलम ८३-जसा 'प्राचीन मराठी गद्य' (उतारा क्र. २६) यात, तसाच 'मराठी बखर गद्य' (क्र. ६, पृ ५५) या दुसऱ्याहि संकलनात समाविष्ट केला आहे. उभय 'गद्य' ग्रंथाच्या संपादकांनी 'उधो माधो-उद्धव माधव या नांवाचा हिंदी संत कवि' असें 'टीपा'त म्हटले आहे. चर्चाभूत दोहा असा:-

तेरे मन में कछु और। कर्ता के कछु और ॥
उधो माधो कहे। झूटी मनकी दौर ॥

संपादकीय टीपेच्या विनचुकपणाविषयी डॉ. हेरवाडकरांनी शंका प्रकट केली. "उधो माधो नामक कोणी हिंदी संत कवि असल्याचें दिसत नाही" असे म्हणून आणि "वस्तुतः 'उधो माधो कहे' याचा सरळ अर्थ उद्धवाला माधवाने (कृष्णाने) सांगितले असा घेणे उचित ठरेल" असे सांगून त्यांनी या लापनिकेचे संक्षेपाने समर्थन केले आहे.

'भाऊ-बखर' या ग्रंथाच्या नव्या-६व्या आवृत्तीच्या संपादकांनी हा 'दोहरा' मुळात समाविष्ट केला नसून तो तळटीपेत दिला आणि 'हे कवन साने (प्रत) १९२२ मध्ये आहे, पण (भा. इ. सं) मंडळ प्रतीत तसेंच १८७९ च्या साने प्रतीत नाही" असे तो वगळण्याचे कारणहि दिले आहे. यामुळे दोह्याचे येथील अस्तित्व मुदली विवाद्य ठरते. तो प्रश्न सध्या आगंतुक म्हणून बाजूला ठेवू व आहे तो दोहा निरखून पाहू.

मूळ 'दोहरा' त्रुटित आहे. 'भा. ब.'तील दुसऱ्या दोन (पृ. ५८ व ७३ वरील) दोह्यात हा दोष दिसत नाही. दोह्याच्या विषम चरणात १३ आणि

समचरणात ११ मात्रा असतात. शेवटचे अक्षर लघु असते. प्रस्तुत दोह्यातील तिसऱ्या चरणामधील पदांचा अर्थ या वादाचा विषय असून तोच तिसरा चरण तोकडा आहे. त्यात ३ मात्रा कमी पडतात. किंवहुना चरणाचे हे अधूपण अर्थाच्या संदिग्धतेला सहायकच झाले आहे. 'उधो, माधो' ही क्रमशः उद्धव, माधव या नामांची तद्भव रुपे होत. 'माधो' प्रमाणे तत्समाचा मात्राभार तद्भवात कायम राहायचा तर 'उद्धव'चें 'ऊधो' असे दीर्घादि रुप व्हायला पाहिजे. तेच रुप रुढ असल्याचे पुढे म्हणीवरून दिसून येईल. 'कहे' या क्रियापदाचा या दोहोंपैकी (कोणता तरी) एक कर्ता झाल्यावर (राहिलेल्या) दुसऱ्याला चतुर्थीचा (मराठीतील 'स-ला-तें' प्रमाणे) 'से' अथवा 'को' यांपैकी एक प्रत्यय व्याकरण दृष्टया लावला म्हणजे दोह्याचा हा विषम चरण 'ऊधो से (ऽ को) माधो कहे' अथवा 'ऊधो माधो से (ऽ को) कहे' असा पूर्ण १३ मात्रांचा म्हणजे छंदाच्या व व्याकरणाच्या दृष्टींनी पूर्ण व शुद्ध होतो. मात्र या पर्यायात 'कहनेवाला' खरोखर कोण ही 'जटिल' समस्या शिल्लक राहतेच. तिचे निराकरण पुढे विवरणावरून होईल असे वाटते. त्यापूर्वी 'पत्रव्यवहारा'तील विधानांचा विचार करू.

(१) उभय संपादकांनी 'उधो माधो' बद्दल दिलेली माहिती भ्रामक आहे. 'या नांवाचा कोणी हिंदी संत कवि असल्याचे ऐकिवांत नाही' असे डॉ. हेरवाडकर म्हणतात ते मान्य आहे. 'ऐकिवात नाही' कारण मुदली तसा कोणी कवि नव्हताच. सागर विद्यापीठाच्या हिंदी विभागातील प्राध्यापक-मित्रांनी तशी ग्वाही दिली. कवीच्या ग्रंथगत नामोल्लेखाच्या अभावी या 'आप्तवाक्या'वर विसंवितो.

(२) डॉ. साहेबांनी 'उधो माधो'चा संवंध उद्धव व माधव (कृष्णा) याच्याशी जोडला असून 'कहे' क्रियापदाचे कर्तृपद त्यांनी 'माधो'ला बहाल केले आहे.

अपेक्षित कारक प्रत्ययाच्या अभावी, 'उधो'चा अग्रक्रम बाजूला सारून, क्रियापदासंनिध म्हणून 'माधो' कर्ता बनला असे दिसते. 'उधो' हे संबोधनहि कल्पिता येते. मूळ रचना व्याकरणदुष्ट म्हणून कोणताहि पर्याय 'दण्डार्ह' ठरणार नाही !

(३) 'उधो माधो' हे कविनाम नसून दोन पौराणिक व्यक्तीची ती नांवे आहेत हे डॉ. साहेबांचे म्हणणे योग्य आहे.

उद्धव व माधव (श्रीकृष्ण) ही भक्त देवांची जोडी प्रसिद्ध असून त्यांच्यातील सख्यभाव व प्रश्नोत्तर संवाद भागवताच्या ११ व्या स्कंधात (एकनाथी

भागवत, उद्धव गीता इ: मराठी टीकांत) प्रकटले आहेत. या दोहऱ्यातील स्फुट विचार श्रीकृष्णाच्या एखाद्या वचनाचा अनुवाद आहे असे म्हणणे कठीण आहे. त्यांत ग्रंथित झालेला आशय इतका साधारण (सर्वानिभूत, सार्वत्रिक) आहे की त्याचे मूळ या संवादातच आहे असा आग्रह धरण्याचे कारण नाही. प्रस्तुत संवादातील एखादी उक्ति यात ध्वनित, प्रतिबिंबित झालेली दिसेलहि; नाही असे नाही. तथापि दोहा अनुवादरूप आहे काय याचा मात्र सर्वांगीण विचार करावा लागेल. मनाची अधीर वृत्ति व दैवाची अन्यत्र प्रवृत्ति यातील विरोध विशद करणारा हा दोहरा कृष्णोद्धव संबंधक आहे असे अनेक विद्वानांचे मत दिसते.

या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी मी पुढील विचार समोर ठेवतो.

येथे त्या प्रसिद्ध पौराणिक व्यक्ति विवक्षित नसून त्यांचा साहचर्य संबंध तेवढा अभिप्रेत आहे उद्धव-माधव या जोडीचे सामान्यीकरण (Generalization) झाले असून पदांचा अर्थविस्तार झाला आहे असे वाटते. ही पदे लक्षणा शक्तीने कोणत्याहि दोन (अ-विशिष्ट) व्यक्तींचा बोध करतात. इंग्रजींत Tom, Dick and Harry अथवा आपल्याकडे 'सोम्या गोम्या' इ. शब्दांची अशी अनिश्चितार्थ-दर्शक योजना करतात तसे हे दिसते.

उद्धवामाधवा सारख्या ख्यातनाम जोडीचे असे अनिश्चय बोधक सामान्यीकरण झाले हे अर्थपरिवर्तन खचित लक्षणीय आहे. हिंदीत हा प्रकार देव व भक्त यांच्या संबंधात झाला, तर मराठींत देवाच्या-'ईश्वरा'च्या आणि इंग्रजीत भक्तांच्या-'संतां'च्या बाबत झालेला पुढील उक्तींवरून दिसून येतो.

(अ) 'नागेश्वराला नागवून सोमेश्वराला वात लावणे. (पहा:—चिप आमच्या देशाची स्थिति, पृ. ४२)

(आ) 'To rob Peter to pay Paul'.

भाषेंत असे सामान्यीकरण कसे रूढ होते हे हिंदीतील खालील वाक्प्रचारांवरून स्पष्ट होईल.

(इ) 'ऊधो की लेना न माधो को देना —किसी से कुछ संबंध न रखना। उदा: मुझसे किसी से क्यों झगड़ा होगा? मैं न ऊधो की लेता हूं न माधो को देता हूं।—डॉ. भो. तिवारी. हिन्दी मुहावरा कोष, पृ. ७१

(ई) 'ऊधो का लेन न माधो का देन'—न किसी का लेना, न किसी का देना।—बालमुकुंद 'अर्श'. मुहावरें और कहावतें, पृ. ५६

एकाच म्हणीची ही दोन स्वरूपे होत. वरील ग्रंथात नमूद न केलेला 'ऊधो माधो के चक्कर में पड़ना' हा वाक्प्रचार एका हिंदी पुराणपाठकाने सांगितला. येथे सर्वत्र दीर्घादि—'ऊधो' आहे हे वर सांगितले आहेच.

एवंच, वरील दोह्यातील 'ऊधो माधो' या पदांनी कोणत्या तरी दोन व्यक्ति ('क्ष' आणि 'य') लक्षित होतात. म्हणून दोह्याच्या ३ऱ्या चरणातील आद्याक्षर दीर्घ करून 'ऊधो-माधो' पैकी कोणाहि एकाला 'से' (~को)' प्रत्यय लावला तरी फारसे बिघडत नाही, चरण पूर्ण व शुद्ध होतो आणि अर्थलापनिकेतील अडचण दूर होते.

या 'ऊधो-माधो'च्या संबंधात प्रस्तुत दोहा व मुहावरे यातील आधीचे कोणते असाच मुळाला हात घालणारा प्रश्न उपस्थित झाला तर तो हिंदीभाषाशास्त्र्यांकडे सोपविणे केव्हांहि उचित होईल. 'भा-बखर' या अभिजात व अभ्यसनीय ग्रंथातील एका अवतरणाशी ही बाब निगडित असल्यामुळे एवढा प्रपंच करावा लागला. याहून अधिक युक्तिसंगत विचार पुढे आला तर तो अभीष्टच आहे.

संस्कृत व्याकरणावरील सुभाषिते (पृष्ठ २१ वरून)

असणार ही मुलगी ? आणि ताडकन् त्याने उत्तर दिले, "अहो हे तर त्याच शब्दाचे चतुर्थीचे एकवचन ! रामाय तसे विहाय ! '

"बरोबर आहे; किती थोर हो तुम्ही !" ती मुलगी त्याची चेष्टा करण्यासाठी पण त्याला उत्साहीत करीत म्हणाली. "आता फक्त दोनच रुपे सांगा की काम संपले. ही जर बरोबर सांगितलीत तर मी नक्कीच आपली भार्या होणार ! मला सांगा, अहम् आणि कथम् ही कसली रुपे आहेत ?"

"त्यात काय मोठेसे ?" आपल्या राम शब्दाची रूपावली मनाशी गुणगुणत आणि भावी आशेचे मनोरे मनामध्ये रचीत तो उद्गारला, "ही तर दोन्ही द्वितीयेची एकवचने आहेत. राम शब्दाचे रामम् त्याचप्रमाणे अहं आणि कथम् !"

त्या विदुषीने वडिलांना सांगून त्या मूर्ख तरुणाला हाकून लाविले पण कां ते त्याच्या शेवटपर्यंत लक्षात आलेच नाही. त्या तरुणीने मात्र एका श्लोकाद्वारे सर्व स्थिति स्पष्ट केली. ती म्हणते,

यस्य षष्ठी चतुर्थी च विहस्य च विहाय च ।
अहं कथं द्वितीया स्याद्द्वितीयास्यामहं कथम् ॥

"ज्याच्या दृष्टीने विहस्य ही षष्ठी, विहाय ही चतुर्थी आणि अहं, कथं ही द्वितीया होते, त्याची मी द्वितीया (भार्या) कशी बरे होणार ?"

'इंदु काळे व सरला भोळे'

[चर्चा]

प्रा. श्री. ना. बनहट्टी व प्रा. सुरेश म. डोळके

प्रा. डोळके–नमस्कार, दादासाहेब, नमस्कार.

प्रा. बनहट्टी–नमस्कार, प्राध्यापक डोळके साहेब, आज आपल्याला वामनराव जोशांच्या 'इंदु काळे व सरला भोळे' या कादंबरीवर चर्चा करायची आहे. कोणत्याहि वस्तूच्या बाह्यांगाकडे आपलं लक्ष पहिल्या प्रथम जातं. या कादंबरीचं बाह्यांग, म्हणजे ज्याला अलीकडे तंत्र म्हणतात, त्याचं वैशिष्टय आपण सहज सांगू शकाल.

प्रा. डोळके–हो. 'इंदु काळे व सरला भोळे' ही कादंबरी वाचताच डोळयात भरणारं तिचं तंत्र–वैशिष्टय म्हणजे तिची पत्रात्मक निवेदनपद्धति. वामनरावांनी या कादंबरीत अवलंबिलेली पत्रपद्धति मराठी कादंबरीवाङमयात तंत्रदृष्टचा तर अभिनव आहेच, पण पात्रांचं आत्मनिवेदनात्मक म्हणजे प्रथमपुरुषी स्वभावदर्शन घडविण्याच्या बाबतीतहि ती अपरूप आहे. या प्रकारच्या कादंबरीचं एक स्थूल वैशिष्टय असं, की त्यातल्या पात्रांच्या हकीकती, त्यांच्या हालचाली अथवा त्यांच्या मनातील संघर्ष आपणाला प्रामुख्यानं त्यांच्या स्वतःच्याच पत्रातून वाचावयाला मिळतात. 'रचनेचा रेखीवपणा' हे या निवेदनपद्धतीचं मुख्यं वैशिष्टय मानलं पाहिजे. कथानकप्रधान कादंबरीत सुश्लिष्ट कथानक रचनेची, नवोन्मेषक्षम घटनानिर्मितीची, आकर्षक प्रसंगरेखाटनाची किंवा स्वाभाविक संभाषणांची जितकी काटेतोल बंधनं कादंबरीकाराला पाळावी लागतात, तितकी ती पाळण्याची दगदग पत्रात्मक कादंबरी लिहिणाराला घ्यावी लागत नाही. किंबहुना असं म्हणावं लागेल, की जी कथा घटनाप्रचुर नाही, कथानकरचना हे ज्या कादंबरीचं प्रमुख अंग नाही व जिच्यामध्ये मनोविश्लेषणावर किंवा वृत्तिवैचित्र्यावरच भर दिलेला आहे अशा कथेचा, त्यातील पात्रांनी लिहिलेल्या पत्रांनीच, खरा व स्वाभाविक आविष्कार होतो. व्यक्तिदर्शनात्मक कादंबरीत, तिच्यातील पात्रांच्या मनात शिरून त्यातील अन्तःकलहांचं चित्र रंगविणं हा जो कलावन्ताचा प्रमुख हेतु असतो, तो पत्रात्मक कथनपद्धतीत सहजगत्याच साधला जातो. शिवाय, या पद्धतीला आत्मनिवेदनाचं

अनुक्रमणिका

स्वरूप आल्यामुळं त्यात विशेष जिव्हाळाहि निर्माण होतो. आता याच कादंवरीचं पहा ना. 'इंदु काळे व सरला भोळे' या कादंवरीतल्या पत्रातून तिच्यातल्या स्त्री-पुरुषांच्या आन्तरिक जीवनांचं दर्शन आपल्याला होतं, त्यांच्या मनातील अन्तःकलहांचं स्वरूप आपल्याला कळतं, त्यांच्या भाव-संघर्षाविषयी आपल्याला जिव्हाळा वाटतो व तीं पात्रं आपल्या डोळयासमोर जिवन्तपणानं वावरू लागतात

वरं, दादासाहेब, वामनरावांनी या कादंवरीत जी पात्रं रंगविली आहेत, त्या सर्वांना विशेष जिव्हाळयाचं वाटणारं असं कांही जीवनतत्त्व किंवा असं काही त्यांच्या आन्तरिक जीवनाचं रूप आपण सांगाल का ?—

प्रा. बनहट्टी—या कादंवरीतल्या वहुतेक सर्व पात्रांच्या जीवनाला व्यापून असणारं आणि त्यांना अत्यंत जिव्हाळयाचं वाटणारं एक तत्त्व मला दिसतं. ते म्हणजे ध्येयवादित्व. आपणाला पटलेलं ध्येय हेच जीवनाचं सारसर्वस्व असं या व्यक्ति मानतात. या कादंवरीतली पात्रं नुसती ध्येयवादी नव्हेत, तर ती ध्येयवेडी आहेत असं म्हटलं तरी चालेल. सुख, स्वास्थ्य, संपत्ति इत्यादिकांची पर्वा न करिता ध्येयाच्या पाठीमागे ती धावत सुटली आहेत. ध्येय म्हणजे काय ? केवळ शरीरसुख, पैसा अडका आणि जड संपत्ति यांच्याहून निराळं व उच्च असं काहीतरी प्राप्तव्य. अर्थात अशा प्राप्तव्याकरिता झटावयाचं म्हणजे सुखाचा व वैयक्तिक स्वार्थाचा त्याग करावाच लागतो. मार्गामध्ये येणारी संकटं खंबीर मनानं सहन करावीच लागतात. अशा ध्येयवादी माणसाचं जीवन दुःखमय, क्लेशमय, कारुण्यपूर्ण वनण्याचा संभव असतो. या कादंवरीतलं प्रमुख पात्र विनायकराव भोळे याच्या जीवनाची अशीच तऱ्हा झाली आहे. अतिशय बुद्धिमान, विद्वान, भावनाप्रधान व सज्जन असा हा तरुण देशभक्ति आणि जन-सेवा हे आपले ध्येय निश्चित करतो आणि त्यापायी खडतर तुरुंगवास, हालअपेष्टा व छळ यांचा हसंतमुखाने स्वीकार करून अखेर ध्येयाच्या पायात मरण पत्करतो. आपल्या सुशील आणि एकनिष्ठ पत्नीला तो दुःखात लोटतो, तिच्या संसार-सुखाची होळी करतो.

मुख्यत्वेकरून विनायकरावाच्या धीरोदात्त आणि ध्येयवादी जीवनामुळेच या कादंवरीला उदात्तकरूण कहाणीचे स्वरूप आले आहे. तरी इतर माणसे-देखील कमी ध्येयवादी आहेत असे नाही. विनायकरावाची सहधर्मचारिणी सरला ही ध्येयवादित्वाच्या बाबतीत त्याची जोडीदारीण शोभेल अशीच आहे. तिचे ध्येय पतिभक्ति हे आहे. विनायकरावाच्या थोर विचारांना, उज्जवल देशभक्तीला व पवित्र आचरणाला भाळून तिने त्याला वरले आणि त्याच्या सर्व कार्यामध्ये आणि संकटांमध्ये तिने त्याला अविचल निष्ठेने साद दिली इंदूचे

ध्येय कलाविकास हे आहे तर नारायण पाठकाचे ध्येय इतिहाससंशोधन हे आहे. यांची ध्येयं म्हणजे खरोखरी वेडंच आहेत. त्या वेडांच्या पायी त्यांनी स्वतःवर दुःख ओढवून घेतलं आहे, आणि आपल्या प्रेमाच्या माणसांना दुःखी केलं आहे. नारायण पाठक तर म्हणतोच की 'इतिहास संशोधनाचे मला आता वेडच लागले आहे. वेड आहे हे मला ठाऊक आहे, पण ते आता ग यचे नाही.' अखेर त्याचे हे वेड उतरते, पण केव्हा--तर त्याच्यासाठी झुरणारी काशी ढवळे ही झुरून झुरून मृत्यूच्या पंथाला लागल्यावर. एवंच काय, 'ध्येयं म्हणजे दुःखं' असं इंदु काळे हिनं आपल्या एका पत्रात म्हटलं आहे तेच सर्वत्र अनुभवाला येतं.

प्रा. डोळके–दादासाहेब, ध्येयं म्हणजे वेडं किंवा ध्येयं म्हणजे दुःखं हे वामनरावांनी या कादंबरीतील बहुतेक पात्रांच्या जीवनातलं एक तत्त्व म्हणून सांगितलं आहे, असं आपण आताच सांगितलं. पण या ध्येयासक्तीला केवळ वेडच म्हणता येईल का ? की त्या वेडातहि कांही उदात्तता, कांही वैचारिकता दिसते?–

प्रा. बनहट्टी—अर्थात ध्येयातील उदात्तता दर्शविण्यास वामनराव विसरले नाहीत व ध्येयांच्या जोडीनं काही जीवनविषयक मूलगामी विचारहि त्यांनी व्यक्त केले आहेत. ध्येय म्हणजे श्रेष्ठ अत्युत्तम असं काहीतरी साध्य म्हणून लौकिक दृष्ट्या दुःख भोगावं लागलं तरी ते भोगूनहि ध्येयासाठी धडपड करण्यात ध्येयवादी लोकांना सात्त्विक समाधानाचा लाभ होत असतो, हे महत्त्वाचं सत्य वामनरावांनी या कादंबरीत स्पष्टपणे दिग्दर्शित केलं आहे. पाचवावडीस असताना खडतर हालअपेष्टा सोसून चालविलेल्या जनसेवेमध्ये विनायकरावांना महान् आनंदाचा लाभ होत होता, आणि पतिनिष्ठ सरलेला त्यांना साथ करण्यात स्वर्गीय सुखाची प्राप्ति होत होती, हे अनेक ठिकाणी सरलेच्या आणि विनायकरावाच्या तोंडून वामनरावावांनी वदविले आहे. हीच जीवनदृष्टी कादंबरीच्या अखेरच्या भाऊ काळे याच्या पत्रात वामनरावांनी व्यक्त केली आहे. तो म्हणतो, 'लौकिकदृष्ट्या पाहिले तर सरलेचे जीवित दुःखमयच गेले, पण लौकिक दृष्टीहून उच्चतर अशी एक दृष्टि आहे. लौकिकदृष्ट्या ध्येयें म्हणजे दुःखें, पण या दुःखांतच उच्च व सात्त्विक आनंद भरलेला आहे.'

कादंबरीची वैचारिकता म्हणाल, तर तीहि इथे उच्च दर्जाची दिसून येते असं मला वाटतं. महत्त्वाच्या जीवनविषयक प्रश्नांचा उलगडा करणारे अनेक विचार विनायकरावांच्या तोंडून वामनरावांनी वदविले आहेत. त्यात हा विचार कदाचित मेरुमणीप्रमाणे शोभू शकेल–'आपलं शुद्ध मन आपल्याला जे कर्तव्य म्हणून सांगतं ते करावं. ते नेहमी करीत राहण्यात जो आनंद तो खरा आनंद. तेच निःश्रेयस, तोच स्वर्ग आणि तेच आत्म्याचे अमरत्व.' तसाच ध्येयवादित्वाच्या यमर्दा व्यक्त करणारा आणखी एक सुंदर विचार त्यांनी विनायकरावांच्या तोंडी

घातला आहे–मनुष्याला नीति पाहिजे, कला पाहिजे, ज्ञान पाहिजे, द्रव्य पाहिजे शरीरसुखहि पाहिजे. एकाच ध्येयाच्या पायी वेडे बनून तुम्ही जीवनाच्या इतर अंगांची हेळसांड कराल तर तुमचं जीवन एकारलेलं आणि बेढव होईल. तुमचं ध्येयवादित्व म्हणजे हटवादीपणा होईल.

नारायण पाठकाचं असंच झालं. त्यानं इतिहाससंशोधनाच्या वेडापायी आपली स्त्रीविषयक भावना दडपण्याचा यत्न केला. परिणामी त्याला आपलं वेड सोडून द्यावं लागलं. हा जीवनाचा एकांगीपणा कसा त्याज्य आहे हे पाठकाऱ्याच तोंडून आणखी अेका ठिकाणी वामनरावांनी दाखविलं आहे. पाठकाला जसं संशोधनाचं तसं इंदूला कलेचं वेड. तिच्या कलेच्या आसक्तीमुळं जे प्रश्न उद्भवले त्यासंबंधानं वामनरावांनी बराच ऊहापोह केलेला दिसतो. डोळकेसाहेब, मला वाटतं आपण त्यासंबंधानं काही सांगू शकाल.

प्रा. डोळके–इन्दूला कलेचं खरोखरीच वेड होतं असं अनेकांना वाटतं. त्यामुळंच, वामनरावांनी या कादंबरीत कला विरुद्ध नीति यांतील संघर्ष चित्रित केला आहे अशी अनेकांची समजूत आहे, व ही अशी समजूत व्हायला कादंबरीतहि ठिकठिकाणी आधार आहे. 'नैतिक तारेच्या सुराशी कलेच्या तारेचा सूर जर जुळला नाही तर जीविताची सतार बदसूर वाजू लागेल आणि कोणालाच कांही आनंद व्हावयाचा नाही' असं इंदु एका पत्रात म्हणते. 'कलेची तहान भागविण्या-करिता नीतीच्या रक्ताचा घोट घेणं बरोबर नाही' असा विनायकरावांनी, म्हण-जेच पर्यायानं वामनरावांनी या प्रश्नाच्या बाबतीत आपला निर्णयहि दिला आहे. पण एवढ्यावरून, वामनरावांनी या कादंबरीत कला विरूद्ध नीति हा संघर्ष खरोखरीच चित्रित केला किंवा तो विविध जीवनचित्रांच्या द्वारा व्यक्त करण्यात वामनरावांना यश मिळालं, असं मात्र मुळीच म्हणता यायचं नाही.

याचं एक कारण असं, की वामनराव रंगवायला गेले नीति आणी कला यांच्यातला संघर्ष; पण त्यांनी दाखविली आहे एका उथळ, नटव्या व कलेबद्दल हौस असणाऱ्या विवाहित तरुणीच्या हृदयातील एका तरुण, फसव्या व आकर्षक रूपाकृति असलेल्या सामान्य पेटीवादकाबद्दलची आसक्ति व त्यामुळं तिच्या अंतःकरणात सांकेतिक नीतीबद्दल निर्माण झालेले विकल्प. इंदु काळेला कला म्हणजे काय, हेच वास्तविक कळत नाही. कलावन्तालाच ती कला समजते. तिला कलेची ओढ होती असं म्हणण्यापेक्षा बिन्दुमाधव या कलावन्ताबद्दलच आसक्ति होती असं म्हटलं पाहिजे. 'अगदी खरं बोलायचं म्हणजे मला त्याचं गाणंबजावणंच आवडतं असं नाही तर त्यांच्याबरोबर बोलणं–चालणंहि आवडतं' या तिच्या उद्गारांचा अर्थ दुसरा काय करावयाचा?––खरी कला ही अनीति-मान् राहूच शकत नाही. कलेचं साहचर्य मांगल्याशीच असतं. कलावन्त

मात्र, माणूस म्हणून, अनीतिमान् राहू शकतो. या कादंबरीतला पेटीवादक विन्दुमाधव हा तसाच आहे. विन्दुमाधवाच्या अनीतिमान् आचरणाचा व कलेचा, तसंच इन्दूच्या विन्दुमाधवाविषयीच्या आसक्तीचा व कलेचाहि परस्परांशी काही संबंध नाही. विन्दुमाधव हा गायनवादन न शिकविता वाङमय शिकवायला आला असता, तरी इन्दुला त्याच्याबद्दल आकर्षण वाटलं असतं, असं मला वाटतं. तिला खरं आकर्षण गायनकलेविषयी नसून गायकाविषयी आहे कलेच्या नावाखाली विंदुमाधवाशी संबंध ठेवणं—त्यानं एकदा किंचित् अतिप्रसंग केला असताहि संबंध ठेवणं——हे कलेविषयीचं आकर्षण खचित नव्हे.

प्रा. बनहट्टी–इन्दु कला आणि कलावन्त या दोघांनाहि एकरूपच मानते आणि विन्दुमाधव म्हणजेच मूर्तिमन्त गायनकला अशा भावनेनं तिचं मन व्यापलेलं असतं, असं नाही का आपल्याला वाटत, डोळके ?——

प्रा. डोळके–नाही, मला नाही असं वाटत, दादासाहेब. कारण, विन्दुमाधव म्हणजे मूर्तिमन्त गायन कला असं वामनराव या कादंबरीत दाखवू शकले नाहीत. विन्दुमाधवाचं चित्र एक कलावन्त या स्वरूपात आपल्या डोळ्यांपुढं उभंच राहत नाही. कलावन्ताची आपल्या कलेवर अव्यभिचारिणी निष्ठा असावी लागते. आपल्या कलेच्या आराधनेत, तो रंगला म्हणजे त्याक्षणी त्याला कलेशिवाय दुसरं अस्तित्वच नसतं. कमीतकमी आपल्या शरीरसुखाची तरी त्याला त्याक्षणी जाणीव नसते. त्यावेळी कलेला तो आपलं सर्वस्व समजत असतो. त्याला इतर कशाची पर्वा नसेल, पण आपल्या कलेची मात्र त्याला विलक्षण चाड असते. कलेला तो आपलं दैवत समजत असतो व या दैवताच्या उपासनेत त्याची भावना पावित्र्याचीच असते. या कादंबरीतला विन्दुमाधव असा जातिवन्त कलावन्त नाही. खरी कला म्हणजे काय हे तर या तथाकथित कलावन्ताला कळत नाहीच, पण नीति म्हणजे काय हेहि त्याला कधी आकळत नाही. त्याच्या जीवनात खऱ्या कलेची ओढ नाही किंवा नीतीची तळमळहि नाही; व त्यामुळंच कला व नीति यांचा संघर्षहि नाही. इन्दूचीहि स्थिति अशीच आहे. तिलाहि खऱ्या कलेची आवड नाही, तिच्या मनावर नीतीची सामर्थ्यवान् पकड नाही; व त्यामुळंच तिच्याहि जीवनचित्रात कला व नीति यांचा आन्तरिक संघर्ष नाही.——अर्थात, वामनरावांनी या कादंबरीत कला विरुद्ध नीति हा संघर्ष खरोखरीच चित्रित केला किंवा तो विविध जीवनचित्रांच्या द्वारा व्यक्त करण्यात वामनरावांना यश मिळालं असं मुळीच म्हणता यायचं नाही.

प्रा. बनहट्टी–ठीक. एकंदरीनं इंदूची कलासक्ति ही काही खरी नव्हती असं आपलं म्हणणं. तरी पण इंदु ही या कादंबरीतली एक प्रमुख व्यक्ति आहे.

तशीच सरलाहि प्रमुखच वाटते. तेव्हा यापैकी कादंबरीची नायिका कोणाला मानावं असं आपलं मत आहे ?——

प्रा. डोळके—'इंदु काळे व सरला भोळे' या कादंबरीला नायिका व उपनायिका यांची नावं वामनरावांनी दिलेली आहेत. त्यांच्यापैकी नायिका कुणाला म्हणावं असा आपला प्रश्न आहे. विनायकरावांचं जीवनचित्रण हा या कादंबरीचा आत्मा मानला, तर सरला ही या कादंबरीची नायिका ओघानंच ठरते. पण मला मात्र, वामनरावांना या कादंबरीत सरलेपेक्षा इन्दूला—तिच्या जीवनचित्रणाला, तिच्या जीवनात उद्‌भवणाऱ्या नानाविध सामाजिक समस्यांना, व्यक्तिजीवन, कुटुंबजीवन व समाजजीवन यांच्यात होणाऱ्या संघर्षाला—अधिक महत्त्व द्यायचं होतं, असं वाटतं. 'इंदु काळे व सरला भोळे' ही एक सामाजिक कादंबरी आहे. व स्त्रीच्या जीवनात निर्माण होणारे सामाजिक प्रश्न वामनरावांनी सर्वात जास्त इन्दूच्याच जीवनचित्राच्या रूपानं या कादंबरीत रंगविले आहेत. या दृष्टीनं इंदु काळे हीच या कादंबरीची नायिका आहे, असं मला वाटतं. वामनरावांना या कादंबरीत महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय कुटुंबातील 'नवी स्त्री' रंगवावयाची आहे. या 'नव्या स्त्री'च्या जाणिवा, तिचं कला-प्रेम, 'रोमॅन्टिकते'चं तिला वाटणारं आकर्षण, व्यक्तिस्वातंत्र्याविषयीच्या व आत्मविश्वासाविषयीच्या तिच्या कल्पना—इत्यादि विविध वृत्तींचा आविष्कार वामनरावांनी या कादंबरीत इंदूच्याच चित्रणात केला आहे. नव्या युगाबरोबर स्त्रीच्या व्यक्तित्वात संचरणाऱ्या नवीनत्वाचं दिग्दर्शन वामनरावांनी इन्दूच्याच रूपानं केलं आहे. अर्थात याहि दृष्टीनं, 'इंदु काळे' हीच या कादंबरीची नायिका आहे, असं म्हटलं पाहिजे.

प्रा. बनहट्टी—अर्थात आपण जिला नायिका मानतो तिचं व्यक्तिचित्रण कादंबरीत कसं झालं आहे हे पाहणं ओघानंच येतं. तरी त्याबद्दल आपण सांगा ना.

प्रा. डोळके—इंदु काळे ही सुशील व उदार असूनहि जरा नटवी व भोगप्रिय आहे. ती स्वतः तर सुंदर आहेच, पण तिला 'सुंदरते'ची मनापासून आवडहि आहे. सुंदरतेच्या व विलासाच्या मोहापायी तिला संयमाचं व विवेकाचं भान राहत नाही. आत्मविश्वासाच्या अहन्तेत समंजस पणाचा तिला विसर पडतो. तिला ललित-कलांचं—विशेषतः संगीतांचं—आकर्षण आहे. इतकंच नव्हे तर तिच्या संगीताच्या आकर्षणाचं कलोपासनेच्या नादीपणात रूपान्तरहि झालं आहे. आणि त्याबरोबरच व्यक्तिस्वातंत्र्याच्या चुकीच्या कल्पनांनीहि तिला भारलेलं आहे. या समजुतींमुळेच तिला बिंदुमाधवाबद्दल विवाहबाह्य आसक्ति वाटते. 'माझी कलेची तहान भागवून घेताना बिंदुमाधवांच्या इतर गोष्टींकडे मी कशाला पाहू' असा युक्ति-

वाद करण्यापर्यंत तिच्या व्यक्तिस्वातंत्र्याची मजल जाते. पण त्याबरोबरच, तिच्या बाबतीत एक गोष्ट मात्र लक्ष्यात ठेवली पाहिजे. पतीला फसविणं अप्रामाणिकपणाचं आहे असं तिला मनापासून वाटतं. तिची खरी भीति पतीला येणाऱ्या भलत्या संशयाबद्दलची होती. भाऊरावाचं मन आपल्याबद्दल खुलं नाही हे तिच्या हृदयातलं खरं शल्य आहे. तिच्या मनातलं कलाप्रेम उथळ असेल—नव्हे, होतंच. पण तिचं पतिप्रेम मात्र उथळ नव्हतं. तिच्या मनातला खरा संघर्ष कला व नीति हा नाही. विवाहबाह्य आकर्षण व पतीला फसविणं पाप आहे अशी प्रामाणिक समजूत या दोन भावनांची परस्परविरोधी आन्दोलनं—हे तिच्या जीवनचित्राचं खरं वैशिष्ट्यच आहे; व ते मात्र वामनरावांनी मोठ्या सहृदयतेनं चित्रित केलं आहे. इन्दूबद्दल, तिच्या अनेक चुका असूनहि, आपल्याला जो जिव्हाळा वाटतो, तो या सहृदयतेमुळेच.

वरं, दादासाहेब, इन्दूचं स्वभावचित्र रंगविण्यात वामनरावांचा काय हेतु होता हे तर मी सांगितलं. आता इन्दूचा पति भाऊराव याच्या स्वभावचित्रात वामनरावांनी भरलेले रंग कोणते, हे आपण सांगाल का ?——

प्रा. बनहट्टी—वामनरावांनी केलेलं भाऊचं व्यक्तिचित्रण मार्मिक आहे. पण इंदूच्या मानानं त्याचं स्थान गौण आहे असं मला वाटतं. इंदूच्या द्वारा ज्या प्रश्नांचा ऊहापोह करायचा आहे, त्यांना आधार किंवा टेकण म्हणून भाऊच्या भूमिकेचा उपयोग कादंबरीकारानं केलेला दिसतो. इंदूचं सौंदर्य, तिची कलाभक्ति व तिचा प्रांजल आग्रहीपणा हे गुण पाहून त्याचं तिच्यावर प्रेम बसलं हे खरं. पण तो स्वतः फारसा कलाप्रेमी दिसत नाही. इंदूच्या कला-प्रेमाचं, सौंदर्यदृष्टीचं कौतुक करावं हे देखील माझ्यासारख्या साध्यासुध्या, रुक्ष, व्यावहारिक माणसाला साधत नाही असं तो म्हणतो. बिन्दुमाधवाचं पेटीवादनच नव्हे, तर तो स्वतःदेखील मला मोहक वाटतो असं इंदूनं सांगितल्या-नंतर देखील त्याची शिकवणी चालू ठेवण्याइतका तो उदार आहे. पण त्याच्या मनात घर करून राहिलेला संशय काही जात नाही व लोकापवादांनी तो गांगरून जातो. यात काहीशी विसंगति आहे, पण मनुष्यस्वभावात अशी विसंगति कित्येकदा आढळते.

भाऊ काळे हा जसा इंदूच्या व्यक्तित्वाला टेकण म्हणून आला, तशीच काशी ढवळे ही पाठकाच्या भूमिकेला जोडगण म्हणून आणलेली दिसते. तुम्हाला कसं काय वाटतं ?——

प्रा. डोळके—काशी ढवळे हे या कादंबरीतलं अत्यंत करुणरम्य असं चित्र आहे. ध्येयं म्हणजे दुःखं हे काशीइतक्या परिणामकारकतेनं वामनरावांनी दुसऱ्या कोणत्याच पात्राच्या बाबतीत दाखविलेलं नाही, असं मला वाटतं. ध्येयं म्हणजे

वेडं व ध्येयं म्हणजे दु:खं असं वामनरावांनी या कादंबरीत सर्वांच्याच बाबतीत दाखविलेलं आहे. पण, काशीचं चित्रण करताना वामनरावातला कादंबरीकार जागा होता, असं माझं म्हणणं. काशी सुशिक्षित आहे, समंजस आहे ती प्रेमवेडी आहे., पण तिच्या या वेडातहि निष्ठा आहे व म्हणून, लौकिक दृष्टीनं जरी त्या वेडात दु:ख असलं, तरी सात्विक दृष्टीनं तिला त्यात आनंदच आहे. तिची प्रेमनिष्ठा सरलेच्या पतिनिष्ठेइतकीच जाज्वल्य आहे. नारायण पाठकावर आमरण प्रेम करणारी, त्याच्या मानसिक प्रीतिमूर्तीची आपल्या कोमल भावपुष्पांनी आदरयुक्त पूजा बांधणारी काशी निष्ठेच्या, समंजसपणाच्या व मनाच्या थोरपणाच्या बाबतीत काही प्रसंगी सरलेवरहि मात करते की काय असा भास होतो.

काशीचं ज्याच्यावर आमरण प्रेम होतं तो नारायणराव कसा होता ? त्याच्याबद्दल आपण काही सांगाल का ?–

प्रा. बनहट्टी–नारायण पाठकाचं व्यक्तित्व एकरंगी आहे आणि ते विनायकरावाच्या अनेक अंगांनी समृद्ध असलेल्या व्यक्तित्वाशी विरोधदर्शन करण्यासाठी योजलेलं दिसतं. इतिहाससंशोधनाच्या ध्येयापायी लहानपणापासून जिच्यावर त्याचं प्रेम असतं आणि जिच्याशी त्याच्या लग्नाच्या आणाभाका झाल्या असतात त्या काशी ढवळेला हा झिडकारतो. 'इतिहाससंशोधनाचं मला आता वेडच लागलं आहे.' वेड 'आहे हे मला ठाऊक आहे पण ते आता जायचं नाही' असं हा म्हणतो. पुढं काशी ढवळेशी भेटीगाठी झाल्यावर तिचं आकर्षण जास्त वाढल्यामुळं म्हणा, किंवा केवळ ज्ञानाच्या पाठीमागे लागल्याने जीवनास पूर्णता येणार नाही हा तात्त्विक विचार पटल्यामुळं म्हणा, त्याचं मन पुढं पालटतं; पण तेव्हा फार उशीर झालेला असतो. याच्या स्वभावात तारतम्य एकंदरीनं कमीच. हा विनोद करायला जातो, पण तो बहुतकरून अप्रासंगिक ठरतो. अशा तऱ्हेची काहीशी एकारलेली व विक्षिप्त पण मुळात प्रेमळ व्यक्ति या कादंबरीत एक रुचकर तोंडीलावणं म्हणून उपयोगी पडते असं दिसतं.

प्रा. डोळके–नारायणरावाचा मित्र विनायकराव. तो तर या कादंबरीचा नायकच. त्याचं चित्रण वामनरावांनी कसं केलं आहे ?–

प्रा. बनहट्टी–नारायण पाठकाला तोंडीलावणं म्हणून मी मघाशी म्हटलं. तीच उपमा पुढं चालवायची झाल्यास या कादंबरीरूपी मेजवानीतलं विनायकराव हे मुख्य पक्वान्न होय असं मी म्हणेन. याच्या चित्रणात वामनरावांनी आपलं बुद्धिसर्वस्व, कलाचातुर्य आणि आपला सगळा जिव्हाळा ओतला आहे. हे एक आदर्श व्यक्तित्व वामनरावांनी आपल्यापुढं उभं केलं आहे. ते आदर्श असलं तरी कृत्रिम किंवा ठोकळेबाज वाटत नाही. विनायकराव म्हणजे आपल्या जिव्हाळ्याचं, आपल्याशी हितगुज करणारं माणूस आहे असा आपल्याला कादंबरी

वाचताना सारखा भास होत असतो. 'मी आपणाला मनानं वरिलं ते आपल्या थोर विचारांना, उज्ज्वल देशभक्तिला, पवित्र आचरणाला व उच्च प्रकारच्या खिलाडू वृत्तीला भाळून' असं सरला त्यांना सांगते. हे सरलेचं म्हणणं आपल्याला पटतं आणि या थोर गुणांपासून हा महात्मा रतिमात्रहि ढळला नाही असं कादंबरी अखेरपर्यंत वाचल्यावर आपल्या प्रत्ययास येऊन अपेक्षापूर्तीचं समाधान आपण अनुभवतो. महात्मा असला तरी विनायकराव हा माणूस आहे. तुरुंगात असताना मित्रांनी आपणहोऊन पाठविलेली मिठाई हा एकवार खातो, पण पुन्हा असं न करण्यावद्दल निक्षून सांगतो. कृष्णंभट फुरशासारखे ब्राह्मण आणि आजारीपणात रखडपट्टी करायला लावणारे पोलीस यांच्या निर्दय लीलांचा त्याला राग येतो, पण विश्ववंधुत्वाच्या दृष्टिकोनात तो तात्काळ लोपून जातो.

विनायकराव ध्येयवादी आहे, पण ध्येयाच्या वेडामुळं त्याचं जीवन एकारलेलं वेढव वनत नाही. देशभक्तीचं ध्येय मुख्य तर खरंच, पण त्यावरोवरच विनायकरावाला प्रेम हवं, संसार हवा; अपत्यप्रेमाचा तर तो फार भुकेला आहे. तो तत्त्वज्ञ असला तरी विनोदी आहे. टेनिस त्याला प्रिय असूनहि भगवद्‌गीता आणि गीतारहस्य यांच्या अभ्यासात त्याचं मन रमतं. मला तर असं वाटतं की विनायकरावांच्या व्यक्तिचित्रणात खुद्द वामनरावांचं व्यक्तित्व वारंवार डोकावतं. लौकिक दृष्टीनं त्याचं जीवन दुःखी असफल झालं. पण लौकिक दृष्टीहून उच्चतर अशी एक दृष्टि आहे, त्या दृष्टीनं पाहता त्याचं जीवन धन्य झालं असंच कोणीहि सहृदय वाचक म्हणेल.

विनायकरावांनी जे काही केलं त्याच्या श्रेयात त्याच्या पत्नीचा फार मोठा वाटा आहे असं दिसतं. सरलेच्या व्यक्तित्वासंवंधानं, डोळकेसाहेव, आपल्या काय कल्पना आहेत ?

प्रा. डोळके–इंदु ही या कादंवरीची नायिका आहे असं मला वाटत असलं, तरी सरलेचं महत्त्व त्यामुळं कमी होतं असं नाही. पतीच्या ध्येयाशी समरस होणारी, त्याच्या ध्येयाकरिता स्वतः कष्ट उपसणारी, जात्याच त्यागप्रिय असलेली सरला ही सुरुवातीपासूनच आपलं लक्ष्य वेधून घेते. उत्कट पतिनिष्ठा हेच तिचं सर्वस्व आहे. पतिनिधनानंतरहि ती पतीचं सामाजिक कार्य पुढं चालविते. तिच्यावद्दल जो आदर वाटतो, त्यात तिच्या त्यागाचा वाटा फार मोठा आहे. इंदूच्या व्यक्तिचित्राकडे पाहिलं की विद्युल्लतेची आठवण होते, सरला ही देव-घरात स्निग्धपणानं प्रकाशत असलेल्या फुलवातीसारखी वाटते.

वरं, दादासाहेव, आपण वामनरावांच्या या कादंवरीचा निरनिराळ्या दृष्टीनी आतापर्यंत विचार केला. आता या कादंवरीचं वैशिष्टय व तिचं

वाङमयीन मूल्य काय आहे हे सांगितल्यास आपल्या या विवेचनाला पूर्णता येईल असं वाटतं.

प्रा. बनहट्टी—ही कादंबरी म्हणजे ध्येयासाठी जीवन अर्पण करणाऱ्या एका धीरोदात्त दाम्पत्याची करुण गाथा आहे. हिच्यात विनोदाची कुसुमं जागोजाग फुललेली आहेत आणि सद्विचारांची परिपक्व फळंहि पुष्कळ आहेत या सर्वांवर उदात्त कारुण्याची दाट छाया पसरलेली आहे, तीच आपलं मन हेलावून सोडते. फार वर्षांनी ही कादंबरी मी आता पुन्हा वाचली. तेव्हा अनेक ठिकाणी अंतः-करण सद्‌गदित झालं व डोळ्यांतून अश्रु ओघळल्याखेरीज राहीनात. यातली सर्व पात्रं विशुद्ध चारित्र्याची आहेत. एक विंदुमाधव अपवाद आहे पण तो इंदूच्या जीवनात पेचप्रसंग उप्तन्न करण्यासाठी मुद्दाम आणलेला असून वहुतांशी पडद्याआड असल्यामुळे वाचकाच्या मनावर स्वःतचा विशिष्ट ठसा तो उमटवू शकत नाही. या कादंबरीत वर्णिलेले सर्व संघर्ष मानसिक व उच्च पातळीवरचे आहेत. विकृत कामवासनेचे व्यभिचारी खेळ मनोविश्लेषणाचं निमित्त करून आणि निसर्गाची सवब सांगून वर्णिलेले या कादंबरीत आढळत नाहीत. वाचताना मन पवित्र वातावरणात विहरत राहतं. काही जणांना ही कादंबरी मनोविश्लेप-णात्मक आहे असं वाटतं. मला तसं वाटत नाही. इंदु काळे आणि नारायण पाठक यांच्यात झालेल्या मानसिक क्रांतीची मीमांसा करण्यासाठी फ्रॉइड वगैरेंऱ्या मनोगाहन शास्त्राची मदत घेण्याची काही जरुरी नाही.

वामनरावांच्या कादंबरीकन्यकांमधलं हे शेंडेफळ. त्याच्या जन्मानंतर गेल्या पंचवीस तीस वर्षात मराठी कादंबरीनं मोठा पल्ला मारला आहे. प्रादेशिक कादंबऱ्या, मनोगाहनी कादंबऱ्या, संज्ञाप्रवाही कादंबऱ्या—अशा अनेक प्रकार या-कादंबऱ्या निघत आहेत. या सर्व निर्मितीचं मूल्य मी कमी लेखीत नाही पण उन्नत जीवनमूल्यं, विशाल दृष्टिकोन, सोज्वळ वातावरण आणि चिरस्थायी तत्त्वविचार यांनी भरलेल्या वामनरावांच्या कादंबऱ्या मराठीत अढळ राहतील व त्यात हे शेंडेफळ आपल्या विशिष्ट प्रकाशानं चमकत राहील.

[नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने]

परिचय–परामर्श

तुकाराम महाराजांची गुरूपरंपरा

ले. श्री. वा. सो. बेन्द्रे

[प्रस्तुत ग्रंथाच्या समीक्षणाचे दोन भाग 'युगवाणी'च्या सप्टेंबर व डिसेंबर १९६२ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहेत. हा तिसरा व शेवटचा भाग प्रसिद्ध होत आहे. ग्रंथाचा विषय महत्त्वाचा व ग्रंथातील संशोधन बरेच भ्रामक वाटल्यामुळे त्याचा सविस्तर परामर्श घेणे आम्हांला इष्ट वाटले. हे कष्टाचे व अप्रिय परंतु पथ्यकर कार्य समीक्षक श्री. व. स. येरकुंटवार यांनी आमच्या विनंतीनुसार तत्परतेने व साक्षेपाने केले याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत—संपादक.]

निराकार लिंगाचा श्री. बेन्द्रे यांनी भलताच दुरुपयोग केला आहे. इस्लामच्या धाडीचा तो एक परिणाम आहे हे स्पष्ट पुराव्याने सिद्ध होते. श्री. भीमाशंकर देशपांडे, आळंदकर, यांनी आपल्या लेखात (महाराष्ट्रांतील चैतन्यसंप्रदाय, ऑक्टोबर १९५९, जीवन विकास, नागपूर) एक मार्मिक मुद्दा मांडला आहे. ते म्हणतात, "यवन आक्रमणामुळे समाधि वगैरे पण सुरक्षिततेकरिता मदारी स्वरूपाच्या बांधत. महिपतीकृत भक्तलीलामृतांत चंद्रभटाने समाधीबद्दल सुचविले. 'त्याचे मनोगत जाणोनि पाहि। समाधीस्त बैसविला विदेही। परियवन उपद्रव करितील कांही। मात्र एक युक्ति तोहि योजिली ॥७४॥ जैसी अविंधांची मदार जाण। तैसेचि वर रचिलें स्थान। हिंदू आणि ते यवन। समाधान पावले ॥७५॥ (अध्याय १४)

उपरिनिर्दिष्ट सर्वच स्थानी इमारती पाहता भारतीय शिल्पशास्त्राप्रमाणे देवळे आहेत. भारतीय शिल्पशास्त्राचा धर्मतत्त्वाशी निकटचा संबंध आहे. शिलालेख, दीपमाळ, मूर्ति, शिल्पाकृति, कासव वगैरे भारतीय मानचिन्हे काढण्याची पद्धत फार जुनी आहे." (पृ. ४३८) ही गोष्ट लक्षात घेतल्यास चैतन्यत्रयींच्या समाधींच्या बाबतीत आढळून येणाऱ्या वैशिष्ट्यांचा उलगडा होतो.

आता आपण बाबाजी चैतन्य व श्रीतुकाराम यांच्याकडे वळू.

केशव चैतन्य व बाबाजी एक होत अशी श्री. बेन्द्रे यांची 'मंत्रगीते'च्या काळी समजूत होती. या ग्रंथात ते वेगवेगळे आहेत हे दाखविले आहे, चांगले

अनुक्रमणिका

दाखविले आहे. पण त्यात त्यांना असा कटाक्ष दिसून येतो, की त्यांना चैतन्य म्हणत नसत. परंपरेत सर्वत्र त्यांना 'बाबाजी चैतन्य' व 'बाबाजी चैतन्य मठ' असे म्हणत असल्याचे त्यांनी नमूद केले आहेच. बाबाजी श्रीतुकारामांचे गुरु होते. केशव चैतन्य व बाबाजी हे वेगवेगळे होत असे दाखविण्याकरिता श्री. वेन्द्रे यांनी श्रीतुकारामांचे 'अधिक महत्त्वाचे' म्हणून जे आधार दिले आहेत त्यात 'तुका म्हणे माझें तोडिले बंधन । बाबाजी चैतन्य सद्‌गुरूनें ॥' असें स्पष्ट म्हटलेच आहे. पुन: श्रीतुकारामांना समकालीन असलेले व त्यांच्या शिष्य-परंपरेत गणले गेलेले 'बाबाजी चैतन्य' असेच म्हणतात. त्यांचे उतारे दिले असूनहि, श्री. वेन्द्रे यांनी हें कां लक्षात घेतले नाही कळत नाही. मला तर असे वाटते, की सत्यसंशोधनापेक्षा त्यांना हे स्वतःच्या कांही दुराग्रहांची विलक्षण प्रतिष्ठा आहे!

बाबाजी चैतन्यांच्या बाबतीत फारशी माहिती उपलब्ध नाही हे खरे. पण जितकी कांही उपलब्ध आहे ती निःसंशयपणे असेच दाखविते, की त्यांचे महानु-भावीय आचारधर्माशी कोणतेच सोयर नव्हते. नव्हे, नव्हे. ते पूर्णपणे वर्णाश्रम-धर्मीय होते. एक दोन ठळक गोष्टींवरूनहि हे स्पष्ट होते. श्रीतुकारामांच्या स्वप्नसाक्षात्काराबाबत श्री. वेन्द्र्यांनी जी बौद्धिक मजा केली आहे त्यासबंधी पुढे लिहितच आहे. पण बाबाजीने पावशेर तूप भोजनास मागितले ही गोष्ट खरी असल्याचे श्री. वेन्द्रेहि कबूल करतात. त्यासंबंधी ते असे लिहितात, "बाबाजींच्या दर्यांतील विशिष्ट आचार म्हणजे तुपाच्या दीपाखेरीज इतर तेल वगैरे न वापरणे. बाबाजी मठातही तोच प्रघात असल्याचे सांगतात. तुकोबा-जवळ तूप मागणे व या प्रघाताचा संबंध जोडण्याचा प्रयत्न करतात. परंतु भोजनास इतर माणसाकडून संन्यासी, ब्रम्हचारी, ब्राम्हण वगैरे फक्त तूपच घेतात. तेव्हां या संबंधांत कितपत तथ्य आहे तें सांगतां येत नाही." (पृ. २२५) बाबाजी हे ब्राह्मण बालब्रह्मचारी होते इ. गोष्टी श्री. वेन्द्रे यांना संमत आहेत. ते आणखी एका ठिकाणी असेहि ऐतिहासिक सत्य सांगतात, की "पुण्यतिथीला, संन्याशाला, ब्राह्मण सत्पुरुषाला अब्राह्मणांच्या व गावकीच्या सामुदायिक देणग्यान भोजनास तूप देणे हा नेहमीचा शिष्टाचार किंवा प्रघात होता, हे गांवखर्चाची टिपणें वाचतांना सर्वत्र लक्षात येते. असे उल्लेख ब्राह्मणवस्तीच्या गावांत विपूल आढळतात." (पृ. ६६) श्री. वेन्द्रे यांचे हे प्रामाणिक ज्ञान व चैतन्यत्रयीच्या महानुभावीयतेचे विपरीत ज्ञान कुतूहलजनक नाही असे कोण म्हणेल? केशव चैतन्यांच्या समाधीची पूजा फक्त ब्राह्मणच करतात व यवनांना तर आंत शिरकावहि नाही (पृ. १४५), राघव चैतन्यांच्या समाधीच्या बाबतीत, त्यांच्या हिंदू व मुसलमान शिष्यात पडलेला झगडा तोडण्याचा अग्रमान बाबाजीस होता,

तेच हयात अधिकारी पुरुष होते, त्यांनी हिंदूंची ब्राह्मणपद्धतीची सविध सेवा व मुसलमानांची सेवा यांची व्यवस्था लावून दिली (पृ. १२३, २०७, २१७) स्वतः बाबाजींच्या मठाची परंपरा चालविणारा नरसप्पा गृहस्थाश्रमी ब्राह्मण व वैदिकीकर्मात निष्णात होता व तो वैदिक पद्धतीनेच पूजा–अर्चा करित असे इ. सर्व गोष्टी व भोजनास तूप मागण्यासारखे प्रसंग पाहिले, की असे निश्चित वाटते, की बाबाजी चैतन्य देखील परिपूर्णपणे वर्णाश्रमानुयायी होते.

श्री. वेन्द्रे यांची पुढील विधाने पहा:—'बाबाजींचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष अनुग्रह हा फक्त विद्यादानाचा असे, विविध संस्काराचा नसे असे दिसते. (पृ. २१७), ,' ' 'कारण कृष्णदासाच्या लिहिण्यावरून तुकोबांच्या तत्त्वज्ञानाचे वळण ज्ञानेश्वरांच्या ज्ञानदानासारखे नसून राघव चैतन्य व केशव चैतन्य यांच्याच वळणाचे असावेसे वाटते." (पृ. १५५), "श्रीसंतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा गुरूपदेश ही एक सामाजिक आणि पराविद्येचे ज्ञान व शिकवणूक यात फार मोठी उत्क्रांती करणारी घटना आहे." (पृ २२६) मला वाटते, एवढयावरूनहि प्रस्तुत संशोधनाच्या मगजात शिरून बसलेली अळी लक्षात येईल. पूर्वोक्त वाक्यांपैकी पहिल्या वाक्याशी त्याचेच दुसरे वाक्य ताडून पहावे "बाबाजींनी तुकोबांना अवचित 'गंगावाटेवर सापडविलें' व आपली ओळख करून देऊन तुकोबाच्या मस्तकावर हात ठेवला. नुसता उपदेश करणे वेगळे व मस्तकावर हात ठेवून उपदेश देणे वेगळे. 'माथ्यावर हात ठेवणें' हा योग-साधनातील गुरूपदेशाच्या संस्काराचा पूर्तिवाचक वाक्प्रचार आहे." (पृ. २२८) वरील वाक्याच्या अगदी विरुद्ध प्रतिपादन! इतिहाससंशोधनाचे हे एक भूषणच की काय न कळे !

आता त्यांच्या सर्वात मासलेवाईक असलेल्या मुद्याकडे वळू. श्रीतुकारामांना स्वप्नात उपदेश झाल्याचे त्यांनी स्वतःच सांगितले आहे. बहिणाबाई, महिपति इ. नीहि स्वतःच्या बाबतीतला असाच अनुभव सांगितला आहे. श्रीएकनाथांना श्रीज्ञानेश्वरांनी स्वप्नातच आदेश दिला होता. इतरहि कित्येक अशाच घटना निर्दिष्ट करता येतील. श्री. वेन्द्रे यांनी मराठी भाषेचे व ग्रंथावलोकनाचे आपले सर्व ज्ञान ओतून स्वप्न या शब्दाचा अर्थ और कांही लाविला आहे. ते म्हणतात, "येथे स्वप्न झोपेतील स्वप्न का तुरियेतील किंवा समाधींतील स्वप्न याबद्दल फारसा विचार झालेला दिसत नाही. 'स्वप्न' हा शब्द तुरियेतील किंवा समाधीतील आठवणीला तुकारामकाली उपयोजित असत असे स्पष्ट दिसते. सामान्य निद्रेतील स्वप्न निद्रेतून जागृतावस्थेत येण्याच्या म्हणजे निद्रेच्या उत्तर-कालातील असते, तर योगनिद्रेतील स्वप्नजागृतीतून तुरियेत किंवा समाधीत होणाऱ्या अवस्थांतरातील म्हणजे तुरियेच्या किंवा समाधीच्या पूर्वकालातील

असते. पूर्ण तुरियावस्था किंवा समाधी प्राप्त होण्यापूर्वी जी अर्धवट अवस्था असते त्यातील ते असते." (पृ. २२१) श्री. वेन्द्र्यांच्या वैशिष्ट्यानुसार या अर्थाबाबत देखील ते डळमळित असावेत, कारण ते स्वतःच, चैतन्यत्रयीबद्दल श्रीतुकारामांना चांगली माहिती असली पाहिजे हे दाखविताना, स्वप्नाचा रूढ अर्थ स्वीकारून म्हणतात, की "स्वप्न पडण्यालाहि प्रथम बुद्धीला विकल होण्याची जरूरी असते. त्याशिवाय बुद्धीला चित्रसृष्टीच निर्माण करता येत नाही......"(पृ. १८९)

श्रीतुकारामांच्या स्वप्नसाक्षात्काराबद्दल तत्कालीन व उत्तरकालीन जवळजवळ सर्वच संतांचे एकमत आहे. पराधर्मात स्वप्नसाक्षात्कार ही एक विशेष अनुभवाची बाब आहे हे अभ्यासक जाणतातच. तो अनुभव स्वप्नावस्थेत येतो हेहि प्रसिद्ध आहे. श्री. वेन्द्र्यांच्या पद्धतीने अर्थ लावल्यास असेहि म्हणता येईल, की हा संशोधनात्मक ग्रंथ लिहिताना त्यांना जी समाधि लागली असेल त्यापूर्वी ते स्वप्नातच होते! श्री. वेन्द्रे यांनी पराधर्मातील स्वप्नाचा अर्थ जो लावला आहे, तो मद्यजनित निद्रेत जाणाऱ्यांना आत्मीय वाटेल यात शंका नाही!!

'चौ देहाचे माथा...' इ. अभंगात, श्री. वेन्द्रे म्हणतात त्याप्रमाणे, बाबाजींनी उन्मनीची मुद्रा चेपोन देऊन अनुभवास आणून दिली असेल तर ती गोष्ट शास्त्रीयच होती असे म्हणावे लागेल. श्रीरामकृष्ण परमहंसांचे गुरु तोतापुरी यांनी भ्रूमध्यात कांचेचा तुकडा रोवून त्यांना याच अवस्थेचा अनुभव दिला होता; बाबाजींनी श्रीतुकारामांच्या भ्रूमध्यात बोटाने दाबून तसेच केले असेल. बहिणाबाईंचा अनुभव या दृष्टीने लक्षात घेण्याजोगा आहे. श्रीतुकारामांच्या निर्याणानंतर त्या तीन दिवस विठ्ठलाचा अहोरात्र ध्यास धरून बसल्या होत्या. दुसऱ्या दिवशी श्रीतुकारामरूपाने प्रकट होऊन, तीन सोपे मंत्र सांगून विठोबा अदृश्य झाला. तसे होताना, बहिणाबाई सांगतात, 'लाविला अंगुष्ठ भ्रुवामध्यें' असे त्याने केलें. स्वप्नसाक्षात्काराव्यतिरिक्त प्रसंगी बाबाजींनी प्रकट होऊन श्रीतुकारामांना विविध अनुभव दिले असतील, असे कांही कांही अभंगावरून दिसते. 'चौ देहाचे माथां देऊनियां हात...' इ. अभंग त्यातलाच असावा. पण ही गोष्ट वेगळी व स्वप्नसाक्षात्कार ही गोष्ट वेगळी. मुकुंदराजांपासून शेख महंमदापर्यंत पुरातन ग्रंथकारांचा आधार घेऊन, दोन वेगवेगळ्या प्रसंगातील अभंगांची अजब गुंतागुंत करून श्री. वेन्द्रे यांनी स्वप्न या शब्दाचा आपला अर्थ विवृत केला आहे. पण त्यांच्या लक्षात हे आले नाही, की या सर्व उताऱ्यातील वर्णन लाक्षणिक आहे. आत्मा स्वतःची शुद्धावस्था सोडून मलिन झाला, की तो संसाररूपी स्वप्नाचा अनुभव घेत असतो, हे वेदांत-

प्रमेय त्यात मांडले आहे. श्री. बेन्द्रे म्हणतात त्या अर्थाचा तिथे अर्थाअर्थी संबंध नाही. मांडुक्योपनिषदात चार देह व चार अवस्था सांगितल्या आहेत त्याला धरूनहि कांही प्रतिपादन आहे. महानुभाव ग्रंथात याच कल्पनेची नक्कल केलेली दिसून येते. संसारू भणिजे हा दीर्घ स्वप्नू गा: विचार, २६८) श्री. बेन्द्रे म्हण-तात, "वरील सर्व उताऱ्यांवरून पराविद्येतील स्वप्नावस्था म्हणजे आत्मा जीवकोश फोडून आपल्या गर्भवासातून मुक्ततेचा प्रयत्न करितो ती. या अवस्थेतून तुरियेत जावयाचे असते....ही अवस्था क्षणिक नव्हती. त्यानंतर समाधि अवस्था. या सर्व अवस्थेंतून परत पूर्वावस्थेप्रत येण्यास वेळ लागला. त्याअवधींत गुरु निघून गेले...इतकें घाईने उरकून स्वप्नावस्थेंत धाडलें. उन्मनी साक्षात् दाखविली व उन्मनीची मुद्राहि चेपून दिली व थोड्याशा भांबावलेल्या स्वप्ना-वस्थेच्या स्थितीनंतर 'अद्वैत निजानंदां'त मला ठेवून निघून गेले, असें तुकोबा म्हणतात...याप्रमाणे पराज्ञानमार्गाची प्राप्ती होतांच तुकोबा जागृतावस्थेंत आल्यावर ज्यांनी आपल्याला ज्ञान दिलें त्यांचें सद्गुरुत्व व मंत्राचा स्वीकार, नंतर स्नान वगैरे आटोपून शुचिर्भूत झाल्यानंतर आदराने व श्रद्धेने केला." (पृ. २२४) या मजकुराच्या मागची व पुढची सर्व पृष्ठें मासलेवाईक आहेत! बाबाजींनी ओतूरला गंगाकाठेवर अचानकपणे गाठले व घाईघाईतच हा विधि त्यांनी उरकला असे श्री. बेन्द्रे म्हणतात. एकतर दक्षिणवाहिनीला 'गंगा' म्हणून संबोधणे व 'रामकृष्ण हरि' हा मंत्र देणे महानुभावीयतेचे नव्हे! दुसरे असे, की श्रीतुकारामांना 'थोड्याशा भांबावलेल्या' अवस्थेतच टाकून देण्याची घिसाड-घाई त्यांनी केली हे म्हणणे परामार्गातील कोणत्या श्रेष्ठतेचे द्योतक आहे? सडकेवरील रोमिओ–ज्युलिएट यांनाच केवळ शोभणाऱ्या कृत्यासारखें कृत्य बाबाजींनी केले व श्रीतुकाराम त्यांच्या आहारी गेले असेच समजावयाचे की काय? चोरट्या प्रेमाच्या आविष्काराच्या धांदलीत विसर पडावा तसा 'भोजना मागती तूप पावशेर। पडला विसर स्वप्नामाजी॥' असेंच श्रीतुकारामांचे झाले की काय? तिसरे असे, की 'अद्वत निजानंदांत' गेल्यावर सद्गुरु व मंत्र यांच्या स्वीकाराचा संस्कार म्हणजे पुत्रोत्सवाच्या आनंदानंतर गर्भाधानाचा संस्कार! चौथें असे, की हे विद्यादान नव्हे, हा विधिसंस्कारच होय. तात्पर्य हे, की श्री. बेन्द्रे पुष्कळच बालिश लिहू शकतात.

श्री. बेन्द्रे यांना श्री तुकारामांचा गुरूपदेश ही घटना अपूर्व व उत्क्रांति-जनक वाटते. का? तर त्यात वर्णाश्रम धर्माची सारी बंधने झुगारून दिली आहेत म्हणून! चैतन्य संप्रदाय म्हणजे आजचा मानवतावादी संप्रदाय असेच त्यांना म्हणावयाचे आहे. "हा अनुभव एका अनोळखी बालब्रह्मचारी ब्राह्मण सिद्धपुरुषाने आपलीं जातगोत वगैरेची यत्किंचितही विचारपूस न करतां बिन

अनुक्रमणिका

दिक्कत दिला ही घटना सतराव्या शतकांतील तुकोबांच्या विशिष्ट उत्क्रांतिवाचक वाटली असल्यास नवल नाहीं. इतकेंच नव्हे, तर हें अपूर्व दीक्षादान देऊन आपल्या उपकाराबद्दल धन्योद्गाराचीही अपेक्षा न धरितां जसें काय आपद्धर्म म्हणूनच सहजपणें कार्य झाले असें समजून बाबाजी निघून गेले. याचाही वर्णाश्रम धर्मातील किंवा आचारधर्मातील जाचणुकीची खडतर जाणीव झालेल्या मनावर कांहीं सामान्य परिणाम झाला नसला पाहिजे" (पृ. २२८) श्री. बेन्द्रे यांच्या संशोधनांचा हा गाभा !

श्री तुकाराम महाराज बंडखोर होते, ते वर्णाश्रम धर्मामुळे गांजले होते हे वादांत असत्य आहे ही गोष्ट पद्मश्री गणेश गोविंद तथा काका कारखानीस, अध्यक्ष हरिजन सेवक संघ, मैसूर राज्य, विजापूर यांच्या एका लेखावरून देखील निदर्शनास येते. (रामदास आणि रामदासी, वार्षिक अंक शके १८८३. पंढरपूरच्या श्री. बहिरटांचा यात साधार व सुंदर परामर्श घेतला आहे.) श्री तुकारामांनी स्वतःला जातिहीन इ. म्हणवून घेतले आहे. श्री. बेन्द्रे यांच्या 'मंत्र—गीतें' तला यावाबतचा अर्थ व प्रस्तुत पुस्तकातला अर्थ भिन्न आहे. ही उत्क्रांति आहे असेंच आपण धरून चालू ! पण कांही सिद्धांत दोहोतहि सामान्य असेच आहेत. त्यांचा समाचार घेऊन हे फार लांबलेले समीक्षण संपवू.

श्री. बेन्द्रे म्हणतात की श्री तुकारामांच्या घराण्याने गोसावी पंथ स्वीकारला होता व त्यामुळे आचार धर्माप्रमाणे भिक्षुक—ब्राह्मण—वर्ग, इतर गोसावी पंथीयाप्रमाणच, त्यालाहि शूद्रच समजे; तुकोबांची मूळ याती वैश्य-वाणी ही होती. 'मंत्रगीता' व प्रस्तुत पुस्तक यात यावावत त्यांनी आधार दिलेले नाहीत. उलट त्याविषयी चर्चा करताना त्यानी जे उतारे दिले आहेत ते त्यांच्या अंगलट येणारे असून त्यांची स्थिति विलक्षण डळमळित करणारे आहेत. तुकाराम गोसावी इ. तत्कालीन शब्दरचनेवरून श्री. बेन्द्रे त्यांच्या घराण्याला गोसावी पंथी ठरवितात असे दिसते. एक तर हे अज्ञान आहे, नाही तर ती जाणून बुजून केलेली फसवणूक तरी आहे ! त्याकाळीं तत्पूर्वी व त्यानंतर देखील गोसावी हा शब्द पंथीयच केवळ नव्हता, वैराग्यादि गुणयुक्ततेच्या दृष्टीने बहुमानार्थी हि होता, हे श्री. बेन्द्रे विसरतात की डावलतात ? स्वामी हा शब्द याचाच पर्याय आहे. गोसावी शब्द मूळ गोस्वामी याचाच अपभ्रंश नाही काय ? खुद्द श्री तुकारामांच्या अभंगात गोसावी हा शब्द या अर्थच्छटांनी बरेचदा आला आहे. चिंचवडचे प्रसिद्ध गाणपत्य व सिद्ध पुरुष मोरया गोसावी म्हणूनच संबोधले गेले आहेत. गोसावी या शब्दाचा जवळ जवळ सर्व पंथीयात उपयोग केला गेला आहे. महिमट चक्रधराला गोसावी म्हणूनच गौरवितो. श्रीसमर्थांच्या संप्रदायात कितीतरी गोसावी होते. श्रीसमर्थ व शिवाजी यांच्या भेटीबाबत ज्या पत्रातील

'पहिलीच भेट' या शब्दांनी वादघुमाळी उडवून दिली; ते केशव गोसाव्याने दिनकर गोसाव्यास लिहिले होते. अनेक उदाहरणे देता येतील. पुनः असे की गोसावी पंथीय माणूस आपल्या पंथाच्या व्यक्तीस शूद्र इ. दूषणे देईल हेहि शक्य नाही. बहिणाबाईनीच मंबाजी गोसावी व आपाजी गोसावी यांची जी हकिकत दिली आहे, तीवरूनच श्री. बेन्द्रे यांचा तर्क बेबंद ठरतो. वर्णाश्रम धर्मी वैदिक माणूस जी दूषणे देईल तीच या दोन गोसाव्यांनी श्री तुकारामांना दिली आहेत हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. तेव्हां श्री तुकाराम स्वतःला ज्यावेळी शुद्र म्हणवीत तेव्हा ते गोसावी पंथ स्वीकारतात....भिक्षुक–ब्राह्मण–वर्ग शूद्रच समजत' या अर्थानें म्हणवीत हे सर्व श्री. बेन्द्रे यांचे फ्राईडियन पद्धतीचे स्वप्न दिसते ! श्री. बेन्द्रे यांनी "कुणबी" या शब्दाचीहि मोठी गमतीदार उपपत्ति लाविली आहे. (मंत्रगीता पहा) त्याबद्दल इथे जास्त लिहिण्याचे कारण नाही. कुणबी म्हणजे केवळ शेतकरी, कुणबी ही जाति नव्हती. या श्री. बेन्द्रे यांच्या प्रतिपादनावर तूर्त एकच अभिप्राय देतां येईल. श्री. भावे (महाराष्ट्र सारस्वत) व श्री. पांगारकर (मराठीं वाङ्मयाचा इतिहास खंड २ रा) यांनी श्री तुकारामांचे चिरंजीव नारायण गोसावी यांच्या हातची त्र्यंबकेश्वरच्या क्षेत्रोपाध्यायाच्या वहीतील जी वाक्ये दिली आहेत, त्यात 'जात कुनबी' असे स्पष्ट म्हटले आहे. श्री तुकाराम शूद्रवंशी व कुणबी ज्ञातीचे ठरले म्हणून काय झाले ? यात उणेपणा वाटण्याचें काय कारण ? ते तसे असले तरी ते जगद्वंद्य होते हीच गोष्ट प्रधान ना ? आम्हाला तेच खरे भूषण आहे ! असो.

सरते शेवटी, मला जो असल्या जातीच्या संशोधनाबद्दल प्रश्न पडतो तो हा, की याने काय साधले जाणार आहे ? सत्यनिष्ठेची चाड म्हणावी तर कित्येकदा सत्याचा मुर्दा राजरोसपणे पडलेला दिसतो ! अभ्यासकाची भूमिका म्हणावी तर त्यात प्रचाराचा, दुराग्रहाचा व विपरीत ज्ञानाचा खच पडलेला दिसतो ! तरुण पिढीस कांही मार्गदर्शन म्हणावे तर ती या इतिहास–संशोधकां-पेक्षाहि निरंकुश होईल असाच सर्व मालमसाला त्यात दिसतो. मला अखेरीस एकच म्हणावयाचे आहे की असले संशोधन कितीहि झाले, तरी 'ज्ञानबातुकाराम' या लय लावणाऱ्या ध्वनीत जो प्रभाव आहे, त्याने आमच्या अनेक पिढयांच्या हृदयसिंहासनावर आरूढ होऊन जे भावसाम्राज्य आजवर गाजविले आहे, ते आचन्द्रार्क टिकणारे आहे. हे श्री. बेन्द्रयांनी पक्के उमजून असावे. श्री ज्ञानेश्वरां-पासून श्री तुकाराम वेगळे तोडले जाऊ शकत नाहीत, श्री ज्ञानेश्वर वर्णाश्रम धर्माचा पाया तर श्री तुकाराम त्याचा कळस, हे अजर–अमर सत्य सदैव दुमदुमत रहाणार; रहाणारच रहाणार ! असली हजारो संशोधने येतील व जातील; पण हे सत्य हिमनगाप्रमाणे अचलच राहील !

जो दीर्घ कालावधि श्री तुकाराम, त्यांची गुरुपरंपरा व इतर संतश्रेष्ठांच्या संगतीत मी अतिशय आनंदाने व तन्मयतेने घालविला त्याचे श्रेय श्री. बेन्द्रे यांना मी मनापासून देत आहे !

—ब. स. येरकुंटवार

रावसाहेब केशव शिवराम भवाळकर यांचे आत्मवृत्त.

संपादक– प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित

प्रकाशक–विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर.

रावसाहेब केशव शिवराम भवाळकर यांनी लिहिलेले आत्मवृत्त येथील विदर्भ संशोधन मंडळाने प्रकाशित केलेले असून महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाने पुरस्कृत केले आहे. या आत्मवृत्ताचे संपादन नागपूर विद्यापीठाचे मराठीचे रीडर प्रो. भवानीशंकर श्रीधर पंडित यांनी साक्षेपाने केलेले आहे. हे आत्मवृत्त संपादकांनी चरित्रकाराचा अल्पपरिचय, उपोद्घात अनुक्रमणिका इत्यादि परिशिष्टांसह परिश्रमपूर्वक सादर केलेले आहे. रावसाहेब केशव शिवराम भवाळकर यांचा जन्म जुन्नर येथे २७ मे १८३१ रोजी झाला. त्यावेळी पेशवाई बुडून पुरती तेरा वर्षेहि लोटली नव्हती. इ. स. १८४८ मध्यें पुणे येथे त्यांची बुधवार शाळेवर मराठीचे दुय्यम शिक्षक म्हणून नेमणूक झाली. व पुढें चढत चढत या शाळेचे ते मुख्य शिक्षकहि झाले. इ. स. १८६० मध्यें पुण्याहून ठाणे येथे 'शाळांचे दुय्यम तपासनीस म्हणून वरच्या जागेवर बढती मिळून त्यांची बदली झाली. येथे त्यांच्या जीवनाचा पूर्वार्ध संपला.

इ.स. १८३१ ते १८६० या उण्यापुऱ्या तीस वर्षांच्या कालावधीत आपल्या आयुष्यात घडलेल्या संस्मरणीय घटनांचे तपशीलवार व बोलके वृत्त त्यांनी या आत्मवृत्तात ग्रथित केले आहे. भवाळकरांना 'रावसाहेब' ही सरकारी पदवी नव्हती. त्यांच्या सार्वजनिक कार्यामुळे व नेतृत्वामुळेच त्यांना जनतेने ही पदवी बहाल केलेली होती.

आत्मचरित्रकाराच्या जीवनातील शैशवात व तारुण्यात घडलेल्या घडामोडींचे सुरस वर्णन या आत्मवृत्तात आलेले आहे. तत्कालीन सामाजिक व राजकीय जीवनाचे पडसादहि उमटले आहेत. पण यात आत्मकथनाचाच भाग अधिक असल्यामुळे याला आत्मवृत्त म्हणणेच

अधिक यथार्थ ठरेल. पेशवाईच्या समाप्तीनंतरच्या अव्वल इंग्रजी अमदानीतील महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, व राजकीय जीवन-प्रवाहाचे स्वरूप कसे होते याचे निदर्शन प्रस्तुत आत्मवृत्तावरून होते.

हे आत्मवृत्त म्हणजे महाराष्ट्राच्या समाज-जीवनाची बखरच आहे. अविभक्त कुटुंबपद्धतीचे आत्मवृत्तकारांनी रेखाटलेले चित्र विशेष परिणामकारक झालेले आहे. अविभक्त कुटुंब–पद्धतीतील मर्यादशीलता परस्पर जिव्हाळा, वात्सल्य व माया ममता यांनी गजबजलेले प्रसंग मन हेलावून सोडतात. 'हल्ली जरी बुद्धीचें वैभव वाढते प्रमाणावर दिसत आहे, तथापि ममतेचे व प्रेमाचे ते खरे नाणे मात्र क्वचित् आढळते' असे लेखकाने म्हटले आहे त्या काळच्या प्रेमळ माणसांचे या आत्मवृत्तातून दर्शन घडते. व काही पिढ्यांपूर्वीचे हे कुटुंबजीवन आज मोडकळीला आलेले पाहून विषाद वाटू लागतो. गरीब ब्राह्मण कुटुंबाच्या आर्थिक ओढघस्तीचे व दैन्याचे वर्णन मनाला पीळ पाडणारे आहे. इ. स. १८२५–३० च्या सुमारास विद्यमान असलेल्या ग्रामजीवनाचे व कुटुंबजीवनाचे या आत्मवृत्तातील चित्र सजीव व प्रत्ययकारक वाटते. घरातील लोक मर्यादातिक्रम होऊ नये म्हणून किती जपत याचे मोठे हृद्य वर्णन यात आढळते. आत्मवृत्तकार सांगतात–"माझे तीर्थरूप घरातील माणसादेखत मी १०–११ वर्षांचा होईपावेतो माझ्याशीं बोलत नसत. पूर्वी हिंदु घराण्यातील अविभक्त कुटुंबात चाल व रीत मोठी !" एके प्रसंगी लेखकाला नवज्वर झाला असतांना ओसरीवर वडिल मनुष्यांसमक्ष त्याला खांद्यावर घेतले होते. या प्रसंगाचे स्मरण त्याने मुद्दाम नमूद केले आहे. सुख दुःखाच्या व हर्षामर्षाच्या प्रसंगी परस्परांविषयी सहानुभूति व समरसता, नात्यागोत्याच्या व वयोमानाच्या श्रेष्ठकनिष्ठतेचा विचार न करता परस्परांविषयीचा प्रेमळपणा व वात्सल्य याची सहजमनोहर अनुभूति लेखकाने या आत्मवृत्तातून गुंफली आहे. सामाईक कुटुंब विभक्त झाल्यानंतर घडलेले प्रसंगहि किती गंभीर होते !

भाऊबंदकीतील दुधाचा प्रसंग असाच अविस्मरणीय वाटतो. अशा प्रसंगी आईच्या मनाची थोरवी प्रगट होत नसेल तरच नवल ! हे प्रसंग वाचून हरिभाऊ आपट यांच्या कादंबऱ्यांचे कळत नकळत स्मरण होऊ लागते.

हे आत्मनिवेदन जसे प्रेमळ तसेच ते प्रांजल व प्रामाणिक आहे. लेखकाची शैली अनौपचारिक व मनमोकळी असल्यामुळे या ग्रंथाला कौटुंविक सुखसंवादाचे स्वरूप आले आहे. निवेदनात आत्मनिष्ठता आहे व लालित्यहि मन आकृष्ट करते. मातृस्तनपानाचा, लघुशंकेचा अनौपचारिक उल्लेख तर आहेच. शिवाय कृष्णशास्त्री चिपळूणकर लहानपणी मुलींमध्यें मुलींचे खेळ कसे खेळत व ते त्यांना कसे आवडत याचाहि लेखकाने निर्देश केला आहे. विनोद, विनोदी व

मनोरंजक प्रसंग यामुळेहि हे आत्मवृत्त रोचक व आल्हादक बनले आहे. आजाचा उल्लेख 'आत्या' असा आहे.

'माझे आजोबा आत्या यांना पराकाष्ठेचे दुःख झाले' असली वाक्यं वाचून अभावित विनोदनिर्मिति होते. वर्गप्रमुख मॉनिटरला–मालचाटचा हा शब्दप्रयोगहि असाच चमत्कृतिपूर्ण आहे. आजीला 'सासू' म्हणण्याची गफलतहि विनोदाला पोषकच ठरते. ढोंगी भिकारणीची कथा, लग्न ठरण्याचे व लग्नविधीचे तत्कालीन सोपस्कार असेच मनोरंजक वाटतात. पुण्यातील क्लिओपात्रा–सखी वाटोळे' हिचा मिस्किल उल्लेख आहे. कारकुनाच्या थाटामाटाचे उपरोधिक वर्णन आहे. भावि सासऱ्याच्या वर शोधनाचा प्रसंग जितका विनोदपूर्ण तितकाच तो आजच्या काळातहि उद्बोधक वाटेल.

शाळा शालेय जीवन व शालेय अभ्यासक्रम यावर लेखकाने कितीतरी पानें खर्ची घातली आहेत. ही सर्वच माहिती शिक्षण शास्त्राच्या संशोधनाला व विकासाला उपयुक्तच आहे. 'मागता येईना भीक तर पंतोजीपणा शीक' ही त्या वेळची रूढ विचारसरणी होय. 'सालाचा एक रुपया, आवास पुणव सणावाराला निटवाभर दाणे, फळकी व पाटी पूजेबद्दल एक पैसा दक्षिणा' एवढयावर शाळेत प्रवेश मिळे. शाळेतहि बेरजेचा वजावाकीचा असे दोन वर्गच केवळ नसत. साध्या बेरजेचा व रेघाच्या बेरजेचा असे पुन्हा पोटभेद असत. सरकारी शाळांपेक्षा खाजगी शाळांना महत्त्व असे. सरकारी मराठी शाळेतील अभ्यासक्रमहि ठराविक पद्धतीचा असे. बाळशास्त्री जांभेकरासारख्या आद्य पत्रकाराने व मराठीच्या आद्य प्रोफेसराने शिक्षण प्रसार होण्याकरिता एतद्देशियांना वेळोवेळी आवाहन केलेले आहे. 'गुरुचे ज्ञान दसपट असेल तर एकपट तो विद्यादान देऊ शकेल" या उपदेशाचे महत्त्वहि सार्वकालिक आहे.

याच कालखंडात महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाच्या क्षितिजावर अनेक कर्तबगार तारे उदयाला आले. महाराष्ट्रात सुधारणावादाची व प्रगतिवादाची शिकवण या विद्वान् लेखकांनी सर्वदूर प्रसृत केली. पहिले एतद्देशीय प्रोफेसर म्हणून बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर, भाषाविशारद भाऊ महाजन, व्याकरणकार दादोबा पांडुरंग तर्खडकर, सुधारणावादाचे अग्रेसर लेखक गोपाळ हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी, स्त्रीशिक्षणाचे पहिले पुरस्कर्ते ज्योतिबा फुले, पहिले कोशकार मेजर कँडी, यांच्या कामगिरीमुळे ही कारकीर्द दुमदुमून गेली. संधिकाळातील या लेखकाच्या विद्याप्रेमामुळे व अविरत उद्यमामुळे शिक्षणाची रुची तत्कालीन जनतेत झपाटयाने फैलावली. या कालखंडाची ही शैक्षणिक पार्श्वभूमि लेखकाने या आत्मवृत्तातून गुंफली आहे. या निवेदनावरून महाराष्ट्राच्या वैचारिक वाटचालीची प्रगति समजून येते. व दादोबा तर्खडकर, रमाबाई रानडे

अनुक्रमणिका

यांच्या आत्मचरित्रांची आपण अभावितपणे तुलना करू लागतो. महाराष्ट्राच्या संधिकालीन व संक्रमणकालीन जीवनात आपले मन विहार करू लागते व आज झपाट्याने गतार्थ होत असलेल्या कालखंडाशी ते समरसता पावते.

रावसाहेब केशव शिवराम भवाळकर यांचे आत्मवृत्त भवाळकरांच्या पूर्वायुष्यातील घटनावरच आधारले आहे. आत्मवृत्तकारांच्या इ. स. १८६० नंतरच्या जीवनाचा तपशील त्यांनी कथन केलेला नाही. त्यामुळे हे आत्मवृत्त अपूर्णच राहिले आहे. विदर्भातील सर रिचर्ड टेंपल या मध्यप्रांताच्या पहिल्या चीफ कमिश्नराच्या राजवटीत भवाळकर यांची १०—६—१८६२ रोजी रेव्हेन्यू खात्यांत नेमणूक झाली व ते इ. स. १८८६ मध्ये एक्स्ट्रा असिस्टंट कमिश्नरच्या हुद्यावर असताना सेवानिवृत्त झाले. बरीचशी वर्षे विदर्भात वास्तव्य केल्यामुळे भवाळकरांच्या लेखनावर वऱ्हाडी बोलीचा स्पष्ट प्रभाव आढळतो. फारशी शद्बांचा भरणा हे वऱ्हाडी मराठीचे ठळक वैशिष्टच आहे. मुष्किल, कमरा, मामुली, मवजूद, हमेशा, कुल, रोज, इत्यादि उर्दू—फारशी शद्ब या आत्मवृत्तात आढळतात. 'ण' बद्दल 'न', 'वि' बद्दल 'इ', 'श' बद्दल 'स' इत्यादि शद्बप्रयोग; उच्चारानुसारी लेखन 'येधाळा', 'रघतखोड' इत्यादि वैशिष्टये वऱ्हाडीची निदर्शक आहेत. भाषेच्या सुलभीकरणाकडे विशेष ओढा आहे. 'हैस्कूल' 'रैटर-इत्यादि इंग्रजीचे देशीकरणहि आढळते. सुशिक्षिताच्या लेखनातहि अनागराचें' भाषा-प्राबल्य आत्मवृत्तात व्यक्त होते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकालात मराठीची लेखन-प्रक्रिया कशी होती याचे यावरून ज्ञान होते. त्रिरात्र, 'वालुका मृत्तिकामिश्रित' असे संस्कृत सामासिक शद्ब आहेत तर 'माती वाळू' सारखे मराठी समासहि आहेत.

रावसाहेब भवाळकरांचें आत्मवृत्त प्रकाशित करून विदर्भ संशोधन मंडळाने मोठेच कार्य पार पाडले आहे. या आत्मवृत्ताचे संपादन करतांना प्रा० पंडितांनी बरीच औचित्ये सांभाळली आहेत. व मूळ लेखन आहे त्या स्थीतीत प्रसिद्ध करण्यात गुणग्राहकता व संशोधनबुद्धि व्यक्त केली आहे. प्रा. पंडितांकडे संपादनाचे काम सोपवून संशोधन मंडळानेहि गुणाची पारख केली आहे. केवळ वाङमयीन दृष्टीनेच नव्हे तर ऐतिहासिक व सामाजिक दृष्टयाहि या आत्मवृत्ताचे महत्व निर्विवाद मान्य होण्यासारखे आहे. प्रकाशक व संपादक या कामगिरीबद्दल धन्यवादाला पात्र आहेत. !

(—नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने.)

पत्रव्यवहार (पृष्ठ ४ वरून)

या कथेचा रोखहि ख्रिस्ती समाजात शिरून मूळ धरूं पहाणाऱ्या जातिभेदाला विरोध करण्याकडेच आहे. नायक प्रभाकर हा एक हलक्या जातींतून आलेल्या (ख्रिस्ती) मुलीशी लग्न जुळवितो. त्याचा बाप मार्तंड पुरुषोत्तम याला तें पटत नाहीं. म्हणून तो विरोध दर्शवितो. हे विरोध दर्शविणारें पत्रच येथे टिळकांचे मत म्हणून मांडलें गेलें आहे. या पत्रावरून धडा घेऊन प्रभाकरने लग्न रद्द केलें असतें किंवा, लग्न केल्यामुळे त्याला कांहीं दुष्परिणाम भोगावे लागले असें या कथेंत म्हटलेलें असतें, तरच टिळकांचें मत म्हणून हें पत्र मांडतां आलें असतें.

या कथेवरूनच अनुमान करणें निराळें. आणि प्रत्यक्ष टिळकांच्या चरित्रांतील गोष्टी पहाणें निराळें. मला वाटतें, प्रा. पंडित म्हणतात असें जर टिळकांचे मत असतें तर पुढे दिलेल्या दोन घटना घडूंच शकल्या नसत्या.

(एक) बारा दिवसाची, जातीचाच काय, पण आईचाहि पत्ता नसलेली मुलगी टिळकांनीं आपली म्हणून वाढवली व आपल्या औरसपुत्रापेक्षांहि तिचें लालनपालन अधिक लाडानें केले. ही मुलगी त्यांची नव्हे याची कल्पना खुद्द मुलीला वयाच्या ३० व्या वर्षापर्यंत नव्हती.

(दोन) स्वतःच्या मुलाचें लग्न जमवितांना हा सोवळेपणा राखलेला नाही. कु. रूथ सरोदे ही ब्राह्मणांतून आलेली नव्हती. बहुतेक विणकर समाजांतली असावी. ही सोयरीक जमविण्याआधीं टिळकांनीं, आपल्या महारपणाचा मोठा अभिमान असलेल्या गृहस्थांशीं, त्याच्या मुलीसाठीं बोलणें केलें होतें.

५. मुलांच्या मानसशास्त्राबद्दल प्रा. पंडितांचें म्हणणें आहे कीं दत्त, ठोमरे. व लक्ष्मीबाई यांपेक्षां टिळकांचें ज्ञान यांबाबतींत कमी होतें. (पृ. २५).

टिळकांची कित्येक बालगीते पाहिली तर या विधानांत फेर करावा लागेल. "रंगूबाय," "हूं हूं हूं" ही टिळकांचें बालोद्यान या संग्रहांतील पद्यें या साठीं अवश्य पहावी.

बालमानसाच्या ज्ञानाबाबत एक गोष्ट सांगतो. टिळकांनी लहान मुलां-साठीं "स्वप्नभूमि" हा एक खेळ काढला होता. १८९५ ते ९९ या काळांत मनातून दुःखी कष्टी असलेले टिळक बालगोपालांशी खेळण्यांत तासचे तास घालवीत. त्यांनी मुलांसह काढलेले त्या काळचे फोटो मला मिळालेले आहेत. मुलांना डोळे गच्च मिटून शांत रहावयास सांगावयाचे, व त्यांच्याशी बोलता बोलता, पक्षी, फुले, फुलपांखरे अशांची वर्णने इतक्या तन्मयतेने करायची, की

मुलांच्या झाकल्या डोळ्यासमोर साक्षात् चित्रे उभी राहात. हा चमत्कार लहानपणी प्रत्यक्ष अनुभवलेली वृद्ध माणसे अजून हयात आहेत.

६. 'रणशिंग' या कवितेबाबत प्रा. पंडित यांनी दिलेली हकीकत खरी आहे. ती सांगितल्याबद्दल प्रा. पंडित धन्यवादास पात्र आहेत.

७. दत्त, केशवसुत, विनायक, ठोमरे, इन्दुकान्त आदि कवींवर टिळकांची फार ममता होती. (पृ. ३१)

यांतील बहुतेक कवी टिळकांचे प्रिय मित्र होते. कवि विनायक यांची मात्र टिळकांची ओळख नव्हती. त्यांची कधी गांठ पडल्याचेहि ऐकिवांत नाही. १९०७ च्या जळगांवच्या कविसंमेलनाच्या वेळी हा योग होता, पण कवि विनायकांनी मुद्दाम टिळकांना भेटण्याचे टाळले, असे श्री. फडणीस सांगत. श्री. देवदत्तरावहि म्हणतात की विनायकांचे नांवहि घरी फारसे निघण्याचा प्रसंग येत नसे. त्यांचे वैर किंवा विरोध होता असे मात्र मुळीच नाही. त्यांचा संबंध कधी आला नाही इतकेंच.* दोघांच्या परस्पर मैत्रीचा उल्लेख आधुनिक-कविपंचकांत मात्र केलेला आहे.

८. केशवसुतांवर टिळकांच्या तीन कविता आहेत. (पृ. ३१)

या तीन खेरीज आणखीहि कांही कविता असू शकतील. त्यापैकी एक "संतानाच्या पाशांत परत गेलेल्या एका बंधूबद्दल शोक" ही कविता टिळकांची कविता, भाग ४ या आगामी संग्रहांत समाविष्ट केलेली आहे.

९. टिळकांनी ख्रिस्तीमताचा स्वीकार केल्यावरहि **'माझे दशावतार'** **'काळाशीं संवाद'**, **'गायत्री'** या सारख्या सनातनी कविता रचल्या आहेत. या संबंधांत फडणीस म्हणतात, "टिळकांचे धर्मांतर हे त्यांच्या स्वभावचांचल्याचे निदर्शक होते. टिळकांची मनोवृत्ति हिंदु धर्ममय होती."

श्री. फडणीस यांच्या या विधानाच्या मुळाशी विचारापेक्षा टिळकांवरील आत्यंतिक प्रेमाची भावना मात्र आहे. आपल्याला परमप्रिय असलेली व्यक्ति, आपल्याला परमप्रिय असलेल्या हिंदु धर्माबाहेर असू शकेल हा विवेक त्यांत नाही.

वर उल्लेखिलेल्या तिन्ही कविता "सनातनी" (रुढ अर्थाने) म्हणतां येणाऱ्या नाहीत.

माझे दशावतार—"पुराणान्तर्गत काव्य" हा निबंध टिळकांनी बडोद्याच्या साहित्य संमेलनांत वाचला होता. पुराणांतील कथाकडे काव्य म्हणून पहावे.

---

* पण 'गोविंदाग्रजां'वरील विलापिकेंत ''तर्पिला विनायक पुढती '' असा निर्देश आहे.—भ. श्री. प.

अनुक्रमणिका

इतिहास म्हणून नव्हे. हें सांगता सांगता, अवतार कल्पनेतील काव्य त्यांनी या कविताद्वारे दाखविलेले आहे. त्यांच्या स्वत:च्या धर्मभावनेचा ह्च्याशीं अर्थाअर्थी संबंध नाही.

काळाशीं संवाद—काळ हा अनादि अनंत असला व सर्वशक्तिमान् असला तरी त्यावरहि परमेश्वराची सत्ता आहे हे एक तत्व, कवि व काळ यांच्या संवादातून दाखविण्यापलीकडे या कवितेत कांही नाही. टिळकांच्या धार्मिक भूमिकेचा हा आविष्कार तर सुतराम नाही. त्यांच्या या आविष्काराचें दर्शन, अभंगाजलि, भजनसंग्रह, ख्रिस्तायनाचा कांही भाग यात मात्र होते. निव्वळ कल्पनात्मक अनेक कवितांपैकी ही एक म्हणावी लागेल.

"गायत्री", ख्रिस्तपूर्व तत्त्वज्ञाने व नीतिशास्त्रे सारी अपूर्ण होती. ती ख्रिस्ताने पूर्ण केली, ' हा टिळकांना प्रिय असलेला सिद्धांतच गायत्री या कवितेंत दिसून येतो. त्यांच्या गायत्रीत "सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य" म्हणजे सूर्याचें तेज नव्हे तर ज्याच्या इच्छेने हे जग निर्माण झाले त्या विधात्याचे तेज आहे. आणि या तेजाने प्रेरित केले ते, आद्य ऋषिमुनी, झोरोस्टर, कन्फूशस, बद्ध, शंकराचार्य, महंमद, व शेवटी ख्रिस्त यांना. हे तेज आमचे नेत्र सत्याकडे लावो. ही प्रार्थना निव्वळ हिंदुधर्ममय मनोवृत्तीची म्हणणे भ्रामक आहे. फार झाले तर अगदी आजच्या व्याख्येप्रमाणे Secular वृत्तीची. पण मला स्वत:ला ती एका व्यापक ख्रिस्ती मनोवृत्तीची वाटते.

असो. शंका मतभेद हे असावयाचेच आणि ते असूनहि, प्रां. पंडितांनी आम्हा जिज्ञासू विद्यार्थिजनांना उपकृत केलेले आहे हें मान्य केलेच पाहिजे. त्यांचें मन:पूर्वक आभार मानून मी आपली रजा घेतो.

दि. १–१२–६२ आपला नम्र,

अशोक दे. टिळक

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस
वि. सा. संघ यांजकडून

भेट–

१. सुप्रसिद्ध साहित्यिक आणि खासदार श्री. काकासाहेब कालेलकर यांनी दि. १४–१२–६२ रोजी सकाळी ८–३० वाजता वि. सा. संघाला भेट दिली, सुरुवातीला श्री. ना. रा. शेंडे उपाध्यक्ष आणि प्रा. श्री. गो. काशीकर सरचिटणीस यांनी संघमंदिर आणि रंगमंदिर दाखविले. नंतर चहापानाचा कार्यक्रम झाला.

वर्धापनदिन

२. वि. सा. संघाचा ४० वा वर्धापनदिन दि. १३ आणि १४ जानेवारी ६३ रोजी साजरा करण्यात आला. दि. १३ रोजी सहभोजन झाले. दि. १४ रोजी सकाळी ८–३० वा. विदर्भातील गूढवादी कवि श्री. गुणवंत हणमंत देशपांडे यांच्या हस्ते सरस्वता पूजन आणि सायंकाळी ६–३० वा. वर्धापनदिनानिमित त्यांचे भाषण झाले. रात्री ९ वा. सौ. सुमतिदेवी धनवटे लिखित संगीत सामाजिक "धुळीचे कण" या नाटकाचा प्रयोग वि. सा. संघाच्या नाट्यसमितीच्या वतीने सादर करण्यात आला.

कै. बेहेरे व्याख्यानमाला

वि. सा. संघातर्फे होणाऱ्या कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमालेत प्राचीन व अर्वाचीन मराठी साहित्याचे थोर अभ्यासक आणि शैलीदार वक्ते प्रा. डॉ. शं दा. पेंडसे यांची "पानिपतचा संदेश" या विषयावरील तीन व्याख्याने दि १६, १७ आणि १८ जाने. ६३ रोजी "मारितां मारितां मरावें, बचेंगे तो और भी लढेंगे आणि पानिपतचे हुतात्मे" ह्या उपविषयांवर झाली.

कवि व नाटककार कै. राम गणेश गडकरी यांचा ४४ वा स्मृतिदिन

दरवर्षीप्रमाणे कै. राम गणेश गडकरी यांचा चव्वेचाळीसावा स्मृतिदिन-समारंभ दि. २२ जानेवारी १९६३ रोजी सायंकाळी ६–३० वा. धनवटे रंग-मंदिरात वि. सा. संघातर्फे साजरा झाला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून यवतमाळ

येथील अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य आणि ग्रंथकार श्री. ना. वा. पराडकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. प्राचार्य पराडकर यांचे "गडकऱ्यांच्या नाटकातील विनोद" या विषयावर भाषण झाले.

सुरुवातीला गडकरी स्मारक समितीचे आमंत्रक श्री. र. वि. कुळकर्णी यांनी मागील वर्षीच्या कार्याचा अहवाल वाचून दाखविला. तदनंतर कै. राम गणेश गडकरी यांच्या छायाचित्राला प्राचार्य पराडकर यांच्या हस्ते हार घालण्यात आल्यावर नागपुरातील इतर संस्थांनी छायाचित्रास हार घातले. प्रमुख वक्ते प्राचार्य पराडकर यांचा परिचय श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी करून दिल्यावर वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी श्री. पराडकर यांना व्याख्यान देण्यास विनंती केली. नंतर रात्री ९–३० वा. गडकरी सभागृहात उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली कवि–संमेलन झाले. या कविसंमेलनात एकूण ३० कवींनी भाग घेतला.

दि. २३–१–६३ रोजी वि. सा. संघाच्या सावनेर शाखेतर्फे सावनेर येथे कै. गडकरी स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य ना. वा. पराडकर, श्री. ना. रा. शेंडे, श्री. र. वि. कुळकर्णी, श्री. श्री. गो. काशीकर श्री. प्रभाकर गडकरी, श्री. नागेश देशमुख आदि मंडळी प्रामुख्याने सावनेर येथे उपस्थित होती. शाखाध्यक्ष श्री. पुरुषोत्तमभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली सायं. ५ वा. प्राचार्य ना. वा. पराडकर यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

मराठी साहित्यमहामंडळाची सभा

मराठी साहित्य महामंडळाची सभा नागपूर येथे विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रीय कार्यालयात झाली. या सभेला महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे म. म. द. वा. पोतदार, प्रा. श्री. के. क्षीरसागर, मुंबई मराठी साहित्य संघातर्फे श्री. श्री. शं. नवरे, श्री. वा. रा. ढवळे, श्री. बापुराव नाईक, मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे श्री. नरहर कुरुंदकर आणि विदर्भ साहित्य संघातर्फे श्री. ना. रा. शेंडे, श्री. पु. य. देशपांडे आणि प्रा. श्री. गो. काशीकर उपस्थित होते. सभा म. म. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९ आणि २० जानेवारी ६३ रोजी झाली.

वि. सा. संघ : नाट्य समिति

वि. सा. संघाच्या नाट्य समितीने यावर्षी विदर्भातील सुप्रसिद्ध लेखिका सौ. सुमतिदेवी धनवटे यांनी लिहिलेले संगीत सामाजिक "धुळीचे कण" नाटक बसविले असून ह्या नाटकाचे दोन प्रयोग विदर्भ साहित्य संघाने धनवटे रंग-

मंदिरात सादर केले. पहिला प्रयोग वि. सा. संघाच्या वर्धापनदिनी म्हणजे दि. १४ जानेवारी ६३ रोजी रात्री ९ वा. सादर करण्यात आला. यावेळी न्या. मू. ग. ब. वडकस यांनी नाटचप्रयोगाचे उद्घाटन केले.

दुसरा प्रयोग दि. २०–१–६३ रोजी रात्री ९ वा. करण्यात आला. यावेळी माननीय श्री. होमी जे. तल्यारखान मंत्री, (महाराष्ट्र राज्य) उपस्थित होते. त्यावेळी क्रिकेट मॅच खेळण्यास आलेल्या सर्व क्रिकेटपटूंचा सत्कार करण्यात आला.

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिति

– प्रतिवृत्त –

तौलनिक प्रगतिपट १९६१-६२ व १९६२–६३

		१९६१–६२		१९६२–६३		६१–६२	६२–६३
	परीक्षा	सप्टें. ६१	फेब्रु. ६२	ऑगस्ट ६२	जानें. ६३	एकूण	एकूण
१	प्रवेश	४०	८	१५१	२२८	४८	३७९
२	प्रारंभ	२६३	१०५	२१७	३११	३६८	५२८
३	विनीत	४३७	१९७	३५०	४९६	६३४	८४६
४	परिचित	७४	३६	६२	२१३	११०	२७५
५	स्नातक १	०	०	२८	६१	०	८९
६	स्नातक २	०	०	०	१४	०	१४
७	स्नातक पूर्ण	९	१५	१७	३१	२४	४८
८	पारंगत १	०	१	९	७	१	१६
९	पारंगत २	०	०	१	३	०	४
	एकूण	८२३	३६२	८३५	१३६४	११८५	२१९९
	केंद्रसंख्या–	३१	२१	३१	४५	५२	७६

(१) आभार प्रदर्शन–

वरील तौलनिक पटावरून गतवर्षापेक्षा या वर्षीची परिक्षार्थी संख्या जवळजवळ दुप्पट आढळते. प्रस्तुत प्रगतीस संघकार्यकारिणी परीक्षासमिति यांनी नवे धोरण आखण्यास दिलेले उत्तेजन विशेषतः कारणीभूत असून केन्द्राधिकारी, प्रचारक आणि परीक्षक यांनी तत्परतेने दिलेले सहकार्य कारणीभूत आहे. याबद्दल सर्व संबंधीत अधिकाऱ्यांचा परीक्षा-संचालक हार्दिक आभारी आहे.

(२) पदवी परीक्षांचे निकाल–

सर्व पदवी परीक्षांचे निकाल पाच फेब्रुवारी १९६३ रोजी केन्द्र कार्यालयात प्रकाशित झाले असून उर्वरित सर्व परीक्षांचे निकाल १५ फेब्रुवारी १९६३ पर्यंत यथावकाश प्रसिद्ध होतील.

(३) नवी आवेदनपत्रें–

खंडशः उत्तीर्ण झालेल्या सर्व परीक्षार्थ्यांनी पुढील खंडासाठी निकाल प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत नवी आवेदनपत्रें सशुल्क भरून केन्द्रकार्यालयाकडे तावडतोब पाठवावीत.

(प्रा.) माणिक के. बैतुले

दि. ५–२–६२ संचालक परीक्षासमिति वि सा. संघ

विदर्भ साहित्य संघ परीक्षाः जानेवारी १९६३

परीक्षा–फल

साहित्य पारंगत (एम. ए. समकक्ष) सर्वोच्च पदवी परीक्षा

द्वितीय श्रेणी सर्वप्रथम (कुणीच नाही.)

तृतीय श्रेणी–कु. उल्का के. बैतुले, कु. सुधा ना. गडकरी, शं. तु खोकले

साहित्य पारंगत–(एम. ए. समकक्ष) प्रथम खंड

कु. नीलम मा. आठले, कु. अलकनंदा ना. मुन्शी, रा. ना. पांडे.

साहित्य स्नातक (बी. ए. समकक्ष) पदवी परिक्षा

द्वितीय श्रेणी–मो. डो. पटीले, म. रा. रेखे, म. सी. शिरभाते, व. गो. तितिरमारे, सौ. शोभा वा. जोशी, कु. प्रमिलाहि चांदेकर, कु. कुन्दा कोठेकर, मो. म. सांवारे, ना. चि. वाडवुद्धे

तृतीय श्रेणी–ना घु. व्यवहारे, मो. ग. श्रीवास, व. मा. डब्ले, सु. वि. पुरंदरे, सौ. सुनंदा करमरकर, सौ. विद्या दामले.

साहित्य स्नातक (बी. ए. समकक्ष) द्वितीय खंड

कु. आशालता औरंगाबादकर. कु. मन्दा बा. वऱ्हाडपांडे, कु. विजया गो. धामापूरकर, कु. चंद्रजोति कात्यायन, कु. विजया दे. जोशी, कु. शकुन्तला

अनुक्रमणिका

गो. भांडारी, कु. जयवंती रा. तिवारी, शा. ना. वेलकर, कु. प्रेमा व. बल्लाळ आ. म. पाटील.


साहित्य स्नातक (बी. ए. समकक्ष) प्रथम खंड

पं. ना. ठाकरे, वि. वा. विचुरकर, तु. त्रि. इंगराळे, रा. म. ढोकणे, क. दि. देव, श्री. रा. शिंदे, दु. मा. कापसे, श्रीमती सुमति क. काशीकर; म. ना. वानखडे, भी. म. देशमुख, अ. ल. कुळकर्णी, कु. तारा पु. मारुळकर, कु. शैला द साठे, कु. सुमन भा. निनावे, कु. शोभा मा. देशमुख, कु. सुलोचना गो. वेहेरे, कु. अरुणा प्र. देशपांडे, कु. प्रभा गो. गोखले, कु. तारा बा. वऱ्हाडपांडे, कु. लता मा. देशमुख, कु. पार्वती ग. पागे, कु. आशा ग. वोन्द्रे, कु. गीता स. मोहरीर, कु. पुष्पा श्री. कोन्हेरे, कु. पद्मा ल. उघडे कु सुधा अ. आष्टीकर, सौ. वनमाला म. डोंगरवार; कु. पुष्पा चं. घोंगे, सौ. मीना दे. दाते, कु. मंगला रा. व्यवहारे, कु. कुन्दा दि. खानवाले, कु. संजीवनी शं. देशमुख, कु. सुनन्दा आ. कोठे, कु. उषा बा. देशपांडे, कु. विजया दे. टोळ, पु. वा. रामेकर, कु. पौर्णिमा देशमुख, अ. के. देशपांडे, ज्ञा. शा. सावरकर, कु. सुनंदा वा. सहस्रबुद्धे, कु. शकुन्तला रा. देसाई पु. सु. वासनकर.

(प्रा.) माणिक के. बैतुले
संचालक, परीक्षासमिति, ति. सा. संघ

दि. ५-२-६३

अनुक्रमणिका



दर्भ साहित्य संघाच्या नाटच समितीने सादर केलेल्या सौ. सुमतीदेवी धनवटे लिखित संगीत–सामाजिक **"धुळीचे कण"** या नाटकाच्या प्रयोगाचेवेळी घेण्यांत आलेले छायाचित्र.

हे मासिक एम्. जो. सराफ यांनी नागपुर टाइम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर–१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता, संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.